सोलापूर

# तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

धाराशिव | शनिवार, १७ जानेवारी २०२६ । वर्ष ३ रे अंक ३१८ । पाने १२ । किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# भाजपाच्या विजयाचा वारू चौखूर उधळला

**◆ मुंबई, १६ जानेवारी**
**लोकसभा, विधानसभा आणि त्यानंतर झालेल्या नगरपालिका निवडणुकांमध्ये शानदार विजय मिळविल्यानंतर आता भारतीय जनता पक्षाने महानगरपालिका निवडणुकांमध्येही अभूतपूर्व यश प्राप्त केले आहे. मुंबई आणि पुण्यासह २९ पैकी २५ मनपांवर महायुतीची सत्ता येणार आहे. राज्याच्या चारही कोपऱ्यात भाजपाने दणदणीत यश मिळवून आपल्या विजयाचा वारू चौफेर उधळला आहे.**


नागपूर महानगर पालिका सलग चौथ्यांदा जिंकल्यानंतर लक्ष्मीनगर चौकात आनंदोत्सव साजरा करताना भाजपाचे कार्यकर्ते

## मुंबई
### भाजपाने ठाकरेशाही संपविली

भारताचे लक्ष लागून असलेल्या मुंबई महानगरपालिका निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने अभूतपूर्व यश प्राप्त केले. मुंबई म्हणजे ठाकरे, या समजूतीला गाडून टाकत भाजपाने शिवसेनेच्या मदतीने सत्ता स्थापन केली आहे. ठाकरे बंधूंना हा पराभव जिव्हारी लागणारा आहे. मनसेची कामगिरी फारच निराशाजनक ठरली. भाजपा आणि शिवसेनेने एकत्रपणे निवडणूक लढविली तर मराठी अस्मितेच्या मुद्यावर उद्धव आणि राज ठाकरे एकत्र आले. काँग्रेसने वंचित बहुजन आघाडीला सोबत घेतले.



## इचलकरंजी, सांगली
### महायुती सत्तेच्या जवळ

कधीकाळी काँग्रेस पक्षाचे गड असलेले इचलकरंजी आणि सांगली या जिल्ह्यांवर आता भारतीय जनता पार्टीच्या नेतृत्वातील महायुतीने प्रभुत्व स्थापन केले आहे. सांगलीत भाजपाने सर्वाधिक ३९ तर शिवसेनेने २ जागा जिंकल्या आहेत. बहुमतासाठी ४० जागांची गरज आहे. इचलकरंजीत भाजपाने ६५ पैकी ४३ जागा जिंकत स्पष्ट बहुमत मिळविले आहे.

## पुणे, पिंपरी-चिंचवड



### भाजपाने फड मारला
#### दोन्ही राष्ट्रवादींसह सर्वच पक्षांची धुळधाण

**पुणे** : काका शरद पवार आणि पुतण्या अजित पवार यांचे दोन्ही पक्ष एकत्र आल्याने राज्यभरात पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या निकालाकडे सर्वांचे लक्ष लागले होते. पण, मतदारांनी दोन्ही मनपा भाजपाच्या ताब्यात देत दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसची अवस्था दयनीय केली. सोबतच स्वतंत्र लढलेल्या दोन्ही शिवसेना आणि काँग्रेस पक्षालाही लोकांनी साफ नाकारले आहे. पुणे हा काँग्रेसचा तर पिंपरी-चिंचवड हा राष्ट्रवादी काँग्रेसचा गड मानल्या जात होता.

## सोलापूर
### काँग्रेसला मोठा धक्का

महानगरपालिका निवडणुकीच्या इतिहासात काँग्रेसला सर्वात मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले. १०२ सदस्यसंख्या असलेल्या मनपात भारतीय जनता पक्षाने काँग्रेससह सर्वच पक्षांचा दारूण पराभव केला. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस आणि दोन्ही शिवसेना भूईसपाट झाल्या.

## मीरा-भाईंदर, पनवेल
### भाजपाला स्पष्ट बहुमत

महानगरपालिका भारतीय जनता पार्टीच्या ताब्यात आल्या आहेत. दोन्ही ठिकाणी भाजपाला स्पष्ट बहुमत मिळाले. गैरमराठी लोकसंख्या असलेल्या मीरा भायंदरमध्ये तर दोन्ही शिवसेनेला दारूण पराभवाला सामोरे जावे लागले. हे निकाल एकनाथ शिंदेंसाठी धक्का मानला जात आहे. पनवेलमध्ये उबाठाने चांगली लढत दिली. इतर पक्ष मात्र, काठावरही पास होऊ शकले नाहीत.

## नाशिक-जळगाव-धुळे
### खान्देशात भाजपाचा डंका

कधीकाळी शिवसेना आणि मनसेचा गड राहिलेल्या नाशिकवर आता भारतीय जनता पक्षाने सत्ता स्थापन केली आहे. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस, उबाठा, मनसे आणि काँग्रेसला मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले आहे. १२२ सदस्यसंख्या असलेल्या नाशिकमध्ये भाजपाने ७८ जागा जिंकल्या. शिवसेनेला २७ तर उबाठाला अवघ्या तीन जागा मिळाल्या. धुळ्यामध्ये भारतीय जनता पार्टीला ७४ पैकी ५० जागा मिळाल्या तर राष्ट्रवादी काँग्रेसने ८ तर शिवसेनेने ५ जागा जिंकल्या. काँग्रेस, शरद पवार गट, उबाठा आणि मनसे हे पक्ष खातेही उघडू शकले नाहीत. जळगावात महाविकास आघाडीला मोठा धक्का बसला आहे. जळगाव मनपाच्या एकूण ७५ जागांपैकी भाजपाने ४६ जागा जिंकत स्पष्ट बहुमत मिळविले आहे. शिवसेनेने २२ जागा जिंकल्या. उबाठाला अवघ्या ५ तर राकाँला एक जागा मिळाली.

## उल्हासनगर
### महायुतीची जोरदार मुसंडी

उल्हासनगर महानगरपालिकेत महायुतीची सत्ता आली आहे. येथे भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना स्वतंत्रपणे लढले. ७८ सदस्य संख्या असलेल्या या मनपात स्वबळावर सत्ता स्थापन करण्यासाठी आवश्यक असलेला ४० आकडा कुणालाही गाठता आला नाही. पण, भाजपा आणि शिवसेना एकत्र आल्यास महायुतीची सत्ता स्थापन होऊ शकते.

## नवी मुंबई
### एकनाथ शिंदेंचा टांगा पलटी




महानगरपालिकेची निवडणूक कधीकाळी एकसंघ शिवसेनेचे दोन शिलेदार असलेले गणेश नाईक आणि एकनाथ शिंदे यांच्यातील शाब्दिक युद्धाने गाजली. सत्ता मिळविण्यासाठी भाजप आणि शिवसेना यांनी सारी शक्ती पणाला लावली. यामध्ये गणेश नाईक यांच्या नेतृत्वात भाजपाने एकहाती विजय मिळविला आहे. नवी मुंबईत मी शिंदेंचा टांगा पलटी करणार, असे आव्हान नाईक यांनी दिले होते आणि त्यांनी ते खरे करून दाखविले.

## छत्रपती संभाजीनगर-जालना-नांदेड-वाघाळा



### मराठवाड्यात कमळाची जादू

मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना आणि नांदेड-वाघाळा महानगरपालिकांवर भाजप आणि मित्र पक्षांनी सत्ता स्थापन केली आहे. संभाजीनगर आणि नांदेड-वाघाळा मनपात भारतीय जनता पार्टीला मतदारांनी स्पष्ट बहुमत दिले तर जालन्यात भाजपा आणि शिवसेनेने मिळून बहुमताचा आकडा गाठला.

## चंद्रपूर
### काँग्रेस सत्ता स्थापनेच्या नजीक

चंद्रपूर महानगरपालिकेच्य निकालात काँग्रेस आणि त्यांचा मित्रपक्ष असलेल्या जनविकास आघाडीने यंदा मोठी मुसंडी मारली असून, सर्वात मोठा पक्ष म्हणून काँग्रेस पुढे आला आहे. एकट्या काँग्रेसने २७ जागांवर विजय मिळविला. तर जनविकास आघाडीच्या तीन जागांचे पाठबळ त्यांना आधीच मिळाले आहे. त्यामुळे एकूण ३० जागा घेऊन ही आघाडी अग्रेसर आहे.

## अहिल्यानगर
### राकाँ सर्वात मोठा पक्ष

अहिल्यानगर मनपात कुणालाही बहुमताचा आकडा गाठता आला नाही. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेसने सर्वाधिक जागा जिंकल्या आहेत. भाजपा दुसऱ्या क्रमांकावर आहे. काँग्रेस, उबाठाने प्रत्येकी १ तर शिवसेनेने दहा जागा जिंकल्या. महायुती म्हणून एकत्र आल्यास राष्ट्रवादी काँग्रेसचा महापौर होऊ शकतो. मात्र, अपक्षांना सोबत घेऊन अजित पवार भाजपाला सत्तेबाहेर ठेऊ शकतात.

## वसई-विरार
### हितेंद्र ठाकूरांनी गड राखला



वसई महानगरपालिकेत हितेंद्र ठाकूर यांच्या नेतृत्वातील बहुजन विकास आघाडीने आपला गड राखला आहे. ११५ जागांपैकी बहुजन विकास आघाडीला ७१ जागा मिळाल्या आहेत. तर भाजपाला ४३ जागा मिळाल्या. शिवसेनेला एक जागा मिळाली. इतर पक्षांना एकही जागा मिळाली नाही. विधानसभा निवडणुकीत वसई आणि नालासोपारा येथे भाजपाचे उमेदवार विजयी झाले होते.

## भिवंडी-निजामपूर
### कुणालाही बहुमत नाही

भिवंडी-निजामपूर मनपा निवडणुकीत काँग्रेस सर्वात मोठा पक्ष म्हणून समोर आला असला तरी एकाही पक्षाला बहुमताचा आकडा गाठता आला नाही. भाजप दुसऱ्या क्रमांकावर आहे. शरद पवार यांच्या पक्षालाही दुहेरी आकडा गाठता आला. शरद पवार गट आणि अपक्षांना सोबत घेऊन काँग्रेस सत्ता स्थापन करू शकते.

## लातूर
### देशमुख कुटुंबीयांचा दबदबा कायम



महानगरपालिकेने काँग्रेसची लाज राखली आहे. काँग्रेस-वंचित आघाडीने बहुमताचा ३६ हा आकडा गाठला आहे. लातूर जिल्हा हा काँग्रेसचा गड मानला जातो. माजी मुख्यमंत्री दिवंगत विलासराव देशमुख यांचे पुत्र आमदार अमित देशमुख हे विजयाचे हिरो ठरले आहेत. प्रचारसभेदरम्यान भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी दिवंगत विलासराव देशमुख यांच्याबाबतीत आक्षेपार्ह विधान केले होते. त्याचा फटका येथे भाजपला बसल्याचे बोलले जाते.

## परभणी
### उबाठाचा महापौर बसणार

उबाठाचे खासदार संजय जाधवांनी परभणी राखले असून काँग्रेसच्या मदतीने सत्ता स्थापन करण्याची शक्यता आहे. ६५ सदस्यसंख्या असलेल्या परभणीत उबाठाने २४ तर काँग्रेसने १२ जागा जिंकल्या आहेत. भाजपला १२ तर राष्ट्रवादी काँग्रेसला ११ जागा मिळाल्या आहेत.

## कोल्हापूर
### सतेज पाटील एकटेच लढले



राज्यात काँग्रेसची सर्वात चांगली कामगिरी कोल्हापूर महानगरपालिकेत झाली आहे. काँग्रेसचे नेते सतेज पाटील यांच्या नेतृत्वात काँग्रेसने ३७ जागा जिंकल्या तर उबाठाला एक जागा मिळाली. दुसरीकडे भाजपाला २४, शिवसेनेला १४ तर राष्ट्रवादी काँग्रेसला ४ जागा मिळाल्या. अजित पवारांनी साथ दिल्यास महायुतीची सत्ता येथे स्थापन होऊ शकतो.

## मालेगाव
### भारतीय जनता पार्टीला धक्का

मालेगावातील निकाल सर्वच पक्षांसाठी धक्कादायक ठरले आहेत. भारतीय जनता पक्षाला मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले. मालेगाव सेक्युलर फ्रंटमधील इस्लाम पार्टीने ३५ जागा जिंकत निर्विवाद वर्चस्व स्थापित केले. समाजवादी पक्षाने ६ जागा जिंकल्या आहेत. शिवसेनेने १८ जागा जिंकल्या.

## नागपूर
### भाजपाचा विजयाचा चौकार

नागपूर महानगरपालिकेच्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीला स्पष्ट बहुमत मिळाले असून दणदणीत विजयासह आपला गड राखला आहे. शहरात केलेली विकासकामे आणि योग्य नियोजनाच्या बळावर भाजपाला हा विजय मिळविता आला. या निवडणुकीत भाजपाने शंभरचा आकडा पार केला आहे.

### तुरुंगातून रणशिंग फुंकले आणि मैदान मारले!



**जळगाव** : जळगावमध्ये महायुतीचे उमेदवार ललित कोल्हे यांनी तुरुंगातून निवडणूक लढवून दणदणीत विजय मिळविला असून त्यांची आई सिंधुताई कोल्हे आणि मुलगा पीयूष कोल्हे यांनीही विजयाचा गुलाल उधळला आहे. कोल्हे कुटुंबातील या तिन्ही सदस्यांच्या विजयानंतर त्यांच्या समर्थकांनी जळगावात जल्लोषात आनंद साजरा केल्याचे पाहायला मिळाले.

### गौरी लंकेश हत्या प्रकरणातील श्रीकांत पांगारकर विजयी



**जालना** : मनपा निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर सध्या जालन्यातील एका निकालाची सध्या चर्चा सुरू आहे. पत्रकार गौरी लंकेश हत्या प्रकरणातील कथित आरोपी असलेला श्रीकांत पांगारकर जालना महानगर पालिकेच्या निवडणुकीत विजयी झाला आहे. श्रीकांत पांगारकरने जालना महानगर पालिकेच्या वॉर्ड क्रमांक १३ मधून अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढवली होती. मतमोजणीअंती त्याला विजयी घोषित करण्यात आले. आपल्या विजयानंतर पांगारकरने समर्थकांसोबत जल्लोषही साजरा केला. निवडणूक जिंकल्यानंतर श्रीकांत पांगारकरने ढोल-ताशांच्या गजरात गुलाल उधळत विजयाचा आनंद साजरा केला.

### आता मुंबईत येऊन ठाकरे बंधूंची भेट घेणार...
#### निशिकांत दुबेंनी डिवचले



**नवी दिल्ली** : देशातील सर्वात मोठी महानगर पालिका असलेल्या आणि संपूर्ण राजकीय वर्तुळाचे लक्ष लागलेल्या मुंबई महानगर पालिकेच्या निवडणुकीचा निकाल आता स्पष्ट झाला आहे. भाजपा आणि शिंदेसेनेने आघाडी घेतली आहे. दरम्यान, मुंबई महानगर पालिका निवडणुकीचे कल स्पष्ट होताच भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि खासदार निशिकांत दुबे यांनी ठाकरे बंधूंना डिवचले आहे. आता मुंबईत येऊन ठाकरे बंधूंची भेट घेणार आहे, असा टोला निशिकांत दुबे यांनी लगावला.

### 'एक हास्य, दोन शब्द' राणेंची टीका व्हायरल



**मुंबई** : महानगरपालिकेच्या निवडणूक निकालाच्या वेळी मंत्री नितेश राणे यांनी आपल्या नेहमीचा शैलीत उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली आहे. त्यांनी समाज माध्यमावर त्यांचा खळखळून हसणारा आणि दोन शब्दांत दिलेल्या प्रतिक्रियेचा व्हिडीओ शेअर केला आहे.

नितेश राणे यांनी अधिकृत एक्स खात्यावरून एक व्हिडीओ शेअर केला आहे. या यामध्ये ते काहीही न बोलता केवळ खळखळून हसताना दिसत आहेत. मुंबई महापालिकेत उबाठाच्या पराभवानंतर त्यांनी उपरोधिक हास्याचा व्हिडीओ शेअर केला आहे. हा व्हिडीओ शेअर करत नितेश राणे यांनी कॅप्शनमध्ये 'उद्धवजी आणि पेंग्विनला' असे लिहिले आहे. त्यांनी केवळ दोन शब्द वापरून उद्धव ठाकरेंवर निशाणा साधला आहे.

## अमरावती
### स्पष्ट बहुमत नाही

अमरावती महापालिकेची सदस्य संख्या ८७ असून सत्तेसाठी ४५ जागांची गरज आहे. २५ जागांवर भाजपाचे उमेदवार निवडून आले असून महायुतीचा घटक पक्ष युवा स्वाभिमानच्या १५ तर शिवसेनेच्या ३ जागा आल्या आहे. या तिघांच्या एकूण जागा ४३ होतात. त्यामुळे महायुतीला केवळ दोन सदस्यांची गरज आहे. राज्यात महायुतीत असेल्या राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला येथे सत्तेत स्थान मिळणार की नाही, याची चर्चा सुरू झाली आहे. त्यांचे ११ नगरसेवक विजयी झाले आहेत.

### गजा मारणेच्या पत्नीचा दारुण पराभव



**पुणे** : पुण्यात आंदेकर, गजा मारणे, बापू नायर या गुन्हेगारी पृष्ठभूमी असलेल्या कुटुंबीयांना राष्ट्रवादी काँग्रेसने उमेदवारी दिली होती. मात्र या तिघांमध्ये आंदेकर यांनी आपले वर्चस्व राखले असून रविवार पेठ - नाना पेठ भागातून निवडून आले, तर गजा मारणेची पत्नी जयश्री मारणे यांचा दारुण पराभव झाला.

### २२ महापालिकांमध्ये मनसेला भोपळा



**मुंबई** : राज्यातील २९ महापालिका निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर एकत्र आलेल्या ठाकरे बंधूंची कामगिरी अतिशय निराशाजनक ठरली. राज ठाकरे यांच्या मनसेला मुंबईत दुहेरी आकडाही गाठता आलेला नाही. राजकारणात नेहमीच मराठी आणि स्थानिक विरुद्ध बाहेरचे, असा मुद्दा मांडणाऱ्या मनसेला या निवडणुकीत मतदारांनी सपशेल नाकारले. राज्यातील २२ महापालिकेत मनसेचा एकही उमेदवार निवडून आलेला नाही. इतर ठिकाणी एकूणच हा पक्ष दहाच्या आकडाही गाठू शकला नाही. मुंबईबाहेर नाशिक, पुणे येथे राज ठाकरेंची सभा झाली, यावेळी नागरिकांची जमलेली तुफान गर्दी मात्र मतांमध्ये परिवर्तित झालेली नाही. मनसेला मतदारांनी सपशेल नाकारल्याचे चित्र महापालिका निवडणुकीतून समोर आले.

### २२ वर्षांची भाजपाची उमेदवार सई थोपटे विजयी



**पुणे** : अवघ्या २२ वर्षांच्या सई थोपटे हिच्या उमेदवारीने राजकीय वर्तुळाचे लक्ष वेधून घेतले आहे. पुण्यातील प्रभाग क्रमांक ३६ (क) मधून भारतीय जनता पक्षाकडून सई थोपटे ही महाराष्ट्रातील सर्वात तरुण उमेदवार विजयी ठरली आहे. सई थोपटे सध्या पुण्यातील नामांकित महाविद्यालयामध्ये बीबीएच्या अंतिम वर्षात शिक्षण घेत आहे. रोजच्याप्रमाणे कॉलेजचा वर्ग सुरू असतानाच तिला पक्षाकडून फोन आला आणि उमेदवारी जाहीर झाल्याची माहिती मिळाली. अचानक मिळालेल्या या बातमीने सईचा आनंद गगनात मावेनासा झाला. वर्गातील मित्र-मैत्रिणींनी तिचे अभिनंदन केले आणि त्यानंतर सई थेट आपल्या प्रभागात पोहोचली. विद्यार्थिनी असतानाच थेट निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याचा हा क्षण तिच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा ठरला. सई थोपटे गेल्या अनेक वर्षांपासून अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेशी सक्रियपणे जोडलेली आहे.

## अकोला
### भाजपाची सरशी



येथील महापालिका निवडणुकीत ८० पैकी ३८ जागा जिंकण्यात भाजपाला यश आले. तर काँग्रेसने दुसऱ्या क्रमांकाची मते घेत जोरदार मुसंडी मारली. दरम्यान आता सत्ता स्थापनेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. काही प्रभागांत आधी भाजपात असलेले पण ऐनवेळी तिकीट कापण्यात आल्यामुळे दुसऱ्या पक्षाचे तिकीट घेवून विजयी झालेले काही उमेदवार आहेत. त्यामुळे भाजपाला सत्ता स्थापन करणे फार कठीण जाणार नाही.

CMYK

सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शनिवार, १७ जानेवारी २०२६
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com




## विचारपुष्प



अखिल मानवजातीच्या कल्याणासाठी वेद, ऋषिमुनी, महर्षी वेदव्यास, बुद्ध, महावीर, गुरुनानक, जीझस क्राइस्ट, महमद पैगंबर, आद्य शंकराचार्य आणि स्वामी विवेकानंद यांनी जो उपदेश केला, तो प्रत्यक्षात आणण्याचे कार्य परमपूज्य डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी समर्थपणे केले.

**- लक्ष्मणराव भिडे**
रा. स्व. संघाच्या विश्व विभागाचे पूर्व संयोजक आणि दीनदयाल शोध संस्थानचे पूर्व अध्यक्ष

# महानगरांत महायुतीचा माहोल

◆ **मुंबई, १६ जानेवारी**

**२९ महानगरपालिकांसाठी झालेल्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीच्या नेतृत्वातील महायुतीने अभूतपूर्व असे यश प्राप्त करीत जवळपास २५ महानगपालिकांमध्ये दणदणीत विजय मिळविला आहे. देशाचे लक्ष असलेल्या मुंबई महानगरपालिकेवर महायुतीचा भगवा फडकणार आहे. मराठी अस्मितेच्या मुद्यावर एकत्र आलेले उबाठाचे उद्धव ठाकरे आणि मनसेचे राज ठाकरे यांना मुंबईकरांनी नाकारले आहे. उबाठाने जोरदार लढत दिली पण मनसेची कामगिरी फारच निराशानजक ठरली. महायुतीने मराठवाडा, खान्देश, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र आणि मुंबईलगत असलेल्या बहुतांश महानगरपालिका निवडणुकीत शानदार विजय मिळविला.**

### मुंबईत ठाकरे बंधूंचा पराभव
### २९ पैकी २५ मनपांमध्ये महायुतीची सत्ता
### महाविकास आघाडीचा सुपडासाफ

**भाजपाच्या विजयाचा वारू चौखूर उधळला**
पान ३




## महत्त्वाचे

### प्रगतीला गती देणारा कौल

**नवी दिल्ली :** महाराष्ट्रातील महानगरपालिका निवडणुकीत भारतीय जनता पक्ष आणि महायुतीने मिळवलेल्या देदीप्यमान यशाची दखल आता थेट दिल्लीतून घेण्यात आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या विजयाबद्दल महाराष्ट्रातील जनतेचे



मनापासून आभार मानले असून, हा विजय म्हणजे रालोआच्या सुशासनावरील शिक्कामोर्तब असल्याचे म्हटले आहे. महाराष्ट्रातील जनतेशी रालोआचे नाते आता अधिक दृढ झाले आहे, अशा शब्दांत पंतप्रधानांनी राज्यातील मतदारांप्रति आपली कृतज्ञता व्यक्त केली आहे. महापालिकांच्या निकालांचे कल स्पष्ट झाल्यानंतर पंतप्रधान मोदींनी सोशल मीडियाच्या माध्यमातून आपली भूमिका मांडली. ते म्हणाले की, राज्यातील उत्साही जनतेने रालोआच्या जनहितकारी आणि सुशासनाच्या अजेंड्याला आपले आशीर्वाद दिले आहेत. आमच्या कामगिरीचा अनुभव आणि विकासाची दृष्टी जनतेच्या मनाला भावली आहे, हेच या निकालातून दिसून येते. ■

**ताज्या घडामोडी** क्षणाक्षणाला मिळविण्यासाठी **तरुण भारत पोर्टलला भेट द्या किंवा** ९८८१०११६६२ व्हॉट्सअॅप क्रमांकावर संपर्क साधा.

सोबत असलेला क्यूआर कोड स्कॅन करा आणि रहा **क्षणाक्षणाला अपडेट!**

## १५ मनपांमध्ये भाजपाची एकहाती सत्ता

### दोन्ही काँग्रेस, उबाठा, मनसेची निराशाजनक कामगिरी

मुंबई आणि परभणी वगळता उबाठाची कामगिरी अत्यंत खराब झाली. काही ठिकाणी तर खातेही उघडले नाही. सर्वात जास्त फटका शरद पवार गटाला बसला. अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला तर पुणे, पिंपरी-चिंचवड या त्यांच्या बालेकिल्ल्यातच मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले. ■


विजयानंतर मुंबई भाजपा कार्यालयात अभिवादन करताना मुख्यमंत्री फडणवीस

### काँग्रेसला तीन ठिकाणी विजय

**काँग्रेसची एकूणच कामगिरी सुमार झाली असली तरी लातूर , चंद्रपूर आणि भिवंडी-निजामपूर महानगरपालिकांमध्ये काँग्रेस मित्रपक्ष आणि अपक्षांच्या मदतीने सत्ता स्थापन करू शकते.** ■

२९ पैकी तब्बल १५ महानगरपालिकेत भारतीय जनता पार्टीने एकहाती सत्ता प्राप्त केली आहे. यामध्ये पुणे, नाशिक, नवी मुंबई, संभाजीनगर, पिंपरी चिंचवड आदी मनपांचा समावेश आहे. महायुती म्हणून मुंबई, ठाणे, अहिल्यानगर, कल्याण-डोंबिवली, सांगली-मिरज आणि कोल्हापूर येथे सत्ता स्थापनेचा मार्ग मोकळा झाला आहे. मुंबईत महायुतीने ११६ जागा जिंकत बहुमताचा आकडा गाठला. उबाठा-मनसे ला ७३ तर काँग्रेसला २४ जागा मिळाल्या. उबाठाला ६७ तर मनसेने फक्त सहा जागा मिळाल्या.

मुंबईत ठाकरेंचा पराभव झाल्यानंतर भारतीय जनता पार्टी आणि शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष करीत मिठाई वाटली.

### हिंदी भाषिक, गुजराती समाजाचा भाजपाला पाठिंबा

मुंबईसह नवी मुंबई, पनवेल, मिरा-भाईंदर , कल्याण-डोंबिवली, ठाण्यात हिंदी भाषिक, गुजराती, जैन समाजाने भारतीय जनता पक्षाला भरभरून पाठींबा दिला. ■

### उबाठाकडे परभणी

**परभणी हा उबाठाचा बालोकिल्ला आहे. शिवसेना फुटली असली तरी परभणीतील शिवसैनिक शेवटपर्यंत एकनिष्ठ राहिले. येथे काँग्रेसच्या सहकार्याने उबाठाचा महापौर होऊ शकतो.** ■

# सोलापुरात भाजपाचा ८७ जागांवर महाविजय

- ‘अब की बार ७५ पार’चा नारा सार्थकी; विरोधकांचा धुव्वा
- भाजपा लाटेत मातब्बर गारद; मनपावर पुन्हा भाजपाचाच झेंडा
- शिवसेना, राष्ट्रवादीसह महाविकास आघाडीचा फज्जा




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ जानेवारी-**

सोलापूर : सन २०१७ च्या निवडणुकीनंतर झालेल्या सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीत सत्ताधारी भाजपाने ८७ जागा जिंकून अभूतपूर्व विजय मिळवला. यामुळे आता पुन्हा एकदा सोलापूर महापालिकेवर भाजपाचा झेंडा फडकला आहे. निवडणुकीत युती न केलेल्या भाजपाचे सहकारी मित्र पक्षांची धडपड ही या निवडणुकीत व्यर्थ ठरली आहे. याप्रमाणे शिवसेना शिंदे गटाने अवघ्या ४ जागा तर राष्ट्रवादी अजित पवार गटाला केवळ एका जागेवरच समाधान मानावे लागले. महाविकास आघाडीचा अक्षरशः फज्जाच उडाला. एम आयएम पक्षाने ८ जागा जिंकून दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष राहिला आहे.

सोलापूर महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी गुरुवारी कडेकोट पोलीस बंदोबस्तात मतदान पार पडले होते. यासाठी २६ प्रभागातील मतदान केंद्रांमधील त्या-त्या प्रभागातील विविध ३५३ इमारतीतील १०९१ मतदान केंद्र सज्ज करण्यात आले होते. ३४९४ बॅलेट युनिट तर १३६५ कंट्रोल युनिटवर मतदान पार पडले होते. यादरम्यान अनेक प्रभागांमध्ये मतदान केंद्रांवरील मतदान यंत्रे बंद पडण्याच्या प्रकारावरून गोंधळ उडाला होता. महापालिकेच्या १०२ जागांसाठी २६ प्रभागात ५६४ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते. यंदा महापालिकेच्या निवडणुकीसाठी ४ लाख ५७ हजार ९९ पुरुष, ४ लाख ६७ हजार ४७१ महिला आणि १३६ तृतीयपंथी असे एकूण ९ लाख २४ हजार ७०६ मतदार होते. यामधील २ लाख ४८ हजार ८९४ पुरुष, २ लाख ४१ हजार ३२९ महिला आणि ५३ तृतीयपंथी अशा एकुण ४ लाख ९० हजार २७६ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. याची टक्केवारी ५३.०२ टक्के इतकी होती.

शुक्रवारी शहरातील विविध ७ इमारतींमध्ये त्या त्या निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली अधिकारी कर्मचाऱ्यांनी सकाळी १० वाजता मतमोजणीला प्रारंभ केला. मतमोजणीसाठी एकंदरीत सर्व २६ प्रभागातील १०२ जागांसाठी एकूण ३८८ पोस्टल मतांसाठी २६ टेबल संख्या होती. यामध्ये सर्व मिळून ८१ फेऱ्यांमध्ये मतमोजणी करण्यात आली. यामध्ये प्रभागातील मतदार संख्येनुसार ३ ते ५ फेऱ्या प्रत्येक प्रभागासाठी घेण्यात आल्या. यावेळी मतमोजणी केंद्रांवर उमेदवार आणि त्यांचे प्रतिनिधी तसेच मतमोजणी केंद्राबाहेर उमेदवार समर्थकांची मोठी गर्दी झाली होती. उमेदवार निवडून आल्यानंतर केंद्राबाहेर जल्लोष आणि गुलालाची मुक्त उधळण करत कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी केली. मतमोजणीची प्रक्रिया सायंकाळी ५ वाजता पूर्ण झाली असली तरी काही प्रभागांमधील अधिकृत निकाल उशिरापर्यंत हाती आले नाही.

**(उर्वरित वृत्त पान ८ वर)**

# नागपूर, अकोला भाजपाच्या ताब्यात, चंद्रपूरमध्ये काँग्रेस


अकोला मनपा निवडणुकीत विजय प्राप्त केल्यानंतर जल्लोष करताना भाजपा कार्यकर्ते

## अमरावती महानगरपालिकेत महायुतीची सत्ता

◆ **नागपूर, १६ जानेवारी**

**विदर्भातील नागपूर व अकोला या दोन महानगरपालिकांवर भाजपाने एकहाती सत्ता मिळवली आहे, तर अमरावतीचा निकाल मतदारांनी महायुतीच्या पारड्यात टाकला आहे. चंद्रपूरमध्ये मात्र काँग्रेस पक्षाने विजय मिळवला आहे.**

**नागपूर :** नागपुरात भारतीय जनता पार्टीला बहुमत मिळाले असून दणदणीत विजयासह आपला गड राखला आहे. या निवडणुकीत भाजपाने अनेक प्रभागांमध्ये नवीन उमेदवार दिले होते. त्यामुळे जुन्या कार्यकर्त्यांमध्ये काही प्रमाणात नाराजी पसरली होती. मात्र, नाराजांची समजूत काढून त्यांना पुन्हा कामाला लावण्यात भाजपाला यश मिळाले. शहरात केलेल्या विकासकामांच्या भरवशावर आणि योग्य नियोजनाच्या बळावर भाजपाला हा विजय मिळविता आला.

**अकोला :** येथील महापालिका निवडणुकीत ३८ जागा जिंकण्यात भाजपाला यश आले. काँग्रेसने दुसऱ्या क्रमांकाची मते घेत जोरदार मुसंडी मारली. दरम्यान आता सत्ता स्थापनेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. महापालिकेतील वीस प्रभागांतील ८० नगरसेवकांच्या जागांसाठी ४६९ उमेदवार निवडणूक रिंगणात होते. शुक्रवारी जाहीर झालेल्या निकालात भाजपाने ३८ जागांवर विजय मिळवला. यात काही प्रभागांत आधी भाजपात असलेले पण ऐनवेळी तिकीट कापण्यात आल्याने दुसऱ्या पक्षाचे तिकीट घेऊन निवडणूक लढविली होती.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# निघाली ट्रिपल इंजिन एक्सप्रेस...

ई व्हीएम मशीन ते बोटांवरची शाई, अशा मुद्यांवरील आरोप, मतदान केंद्रांवरील गोंधळ आणि मतदारयाद्यांमधील दोष इत्यादी अनेक गोष्टींवरून झालेल्या गदारोळात पार पडलेल्या महाराष्ट्रातील महापालिकांच्या निवडणुकीत भाजपाने आणि त्या पक्षाच्या नेतृत्वातील महायुतीने दणदणीत विजय मिळविला आहे. आपल्याला जनता सतत नाकारत आहे, हे वास्तव न स्वीकारणे, त्यामागील कारणांचा शोध न घेणे, कारणे दिसली तर त्यावर उपाय न करणे आणि कोणत्याही पूर्वतयारीविना निवडणुकीला सामोरे जाणे ही आता विरोधी पक्षांची खासीयत बनलेली आहे. त्यामुळेच त्यांचा सतत पराभव होतो. महाराष्ट्रातील महानगरांवर तसाही भाजपाचा प्रभाव आहेच. तो यावेळी वाढलेला असल्याचे महापालिकांच्या निकालात दिसून आले. मराठी माणूस वाचवा, मुंबई वाचवा, महाराष्ट्र वाचवा अशी निरर्थक तर्कटे आणि ठाकरे ब्रॅण्ड नावाची कल्पना या निवडणुकीच्या निकालांनी पार निकालात काढली. तशी यावेळी महापालिकांच्या निवडणुकीत फार गुंतागुंत होती. कोण कुणासोबत आहे, हेही अनेक ठिकाणी कळत नव्हते. राज्यातल्या सत्तेत एकत्र असलेले एकमेकांच्या विरोधात होते. विरोधकांमध्येही सुंदोपसुंदी होती. भाजपा मात्र आपले नियोजन व्यवस्थित राबवीत होती. त्याचे फळ त्या पक्षाला मिळाले. भाजपाचा दणदणीत विजय हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाचा, प्रदेश भाजपाच्या नियोजनाचा आणि स्थानिक नेते-कार्यकर्ते यांच्या कष्टाचा परिणाम होय. निवडणूक कशी लढवावी, नियोजन आणि प्रचार कसा करावा, हे सर्व राजकीय पक्षांनी भाजपाकडून शिकण्यासारखे आहे. याउलट, निवडणुका कशा लढवू नयेत आणि भलतेच मुद्दे उकरून काढत महत्त्वाचा वेळ वाया कसा घालवावा, हे काँग्रेस-उबाठा गट किंवा मनसे यांच्याकडून शिकले पाहिजे. टीव्हीवर महासभेसारखे वातावरण निर्माण केल्याने नव्हे तर तळागाळात पक्ष रुजविल्याने राजकारणात यश मिळत असते, हे आता तरी विरोधकांनी लक्षात घेतले पाहिजे. भाजपा हा समाजाच्या विविध घटकांत रुजलेला पक्ष. त्यामुळे त्याच्या साथीचा महायुतीतील घटकांना फायदा झाला. महानगरपालिकांच्या निवडणुकीतील भाजपाच्या विजयाने आता महाराष्ट्रात बहुतांशी ठिकाणी विकासाची ट्रिपल इंजिन एक्सप्रेस धावेल. महाराष्ट्रातील नागरी विकास प्रक्रिया त्यामुळे गतिमान होईल, अशी अपेक्षा आहे.

लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात भाजपाला अपेक्षित यश मिळाले नव्हते. मात्र, त्याची भरपाई देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभा निवडणुकीत दामदुपटीने केली. नंतर झालेल्या नगरपरिषद आणि नगरपालिका तसेच आताच्या महानगरपालिका निवडणुकांमध्येही राज्यात देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाला पर्याय नसल्याचे सिद्ध झाले आहे. लवकरच होणाऱ्या जिल्हा परिषद निवडणुकीतही भाजपा-महायुतीच्या विजयाची पुनरावृत्ती होईल, यात संशय नाही. महाराष्ट्रात भाजपाच्या नेतृत्वातील महायुतीची सत्ता असली तरी महायुतीने सर्वत्र संघटितपणे निवडणुका लढविल्या नव्हत्या. याचा अर्थ महायुतीतील भाजपा, शिवसेना एकनाथ शिंदे तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचा अजित पवार गट यांच्यात मतभेद होते, असाही काढला गेला. स्थानिक राजकारणाची गरज म्हणून या तीन पक्षांना काही महानगरपालिकांत वेगवेगळे लढावे लागले. आता निकालानंतर महायुतीतील पक्षांना आणि नेत्यांना आपसातील मतभेद आणि निवडणुकीच्या प्रचारात एकमेकांविरुद्ध केलेली जहरी टीका विसरून सोबत काम करावे लागेल.

महाराष्ट्रात एकूण २९ महानगरपालिकांच्या निवडणुका होत असल्या तरी राज्यातील नव्हे तर संपूर्ण देशातील जनतेचे लक्ष मुंबई महानगरपालिका निवडणुकीकडे लागले होते. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. त्या महानगरपालिकेचा अर्थसंकल्प ७५ हजार कोटींपेक्षा जास्त रकमेचा आहे. देशातील अनेक राज्यांपेक्षा मुंबई महानगरपालिकेचा अर्थसंकल्प मोठा आहे. तेथून राज्याची सूत्रे हलतात, तसे देशाचे अर्थकारणही वाटा-वळणे घेत असते. त्यामुळे मुंबईत कोणाची सत्ता येईल, याबाबत उत्सुकता असणे स्वाभाविक होते. मुंबई महानगरपालिकेवर अविभाजित शिवसेनेची म्हणजे आधी बाळासाहेब ठाकरे आणि त्यानंतर त्यांचे पुत्र उद्धव ठाकरे यांची सत्ता होती. वेगळ्या शब्दांत सांगायचे तर मुंबई महानगरपालिका ही ठाकरे घराण्याची जहागिरी होती. यावेळी शिवसेनेने म्हणण्यापेक्षा ठाकरे घराण्याने मुंबई महानगरपालिका गमावली आहे. राज्याची सत्ता गमावल्याचे जेवढे दु:ख ठाकरे घराण्याला झाले नसेल, त्यापेक्षा मोठे दु:ख त्यांच्यासाठी मुंबई महानगरपालिका गमावल्याचे आहे. ठाकरे घराण्याचा प्राण मुंबई महानगरपालिकेत होता. मुंबई महानगरपालिका ही अविभाजित शिवसेना म्हणजे पर्यायाने ठाकरे घराण्यासाठी प्राणवायूचे काम करत होती. शिवसेनेत उभी फूट पडल्यानंतर झालेली मुंबई महानगरपालिकेची ही पहिलीच निवडणूक होती. याच निवडणुकीतून खरी शिवसेना कोणती, उद्धव ठाकरे यांची की एकनाथ शिंदे यांची, याचाही निर्णय होणार होता. मुंबईच्या जनतेने उद्धव ठाकरे यांचे नेतृत्व झुगारून देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्या संयुक्त नेतृत्वावर शिक्कामोर्तब केले आहे. मुंबई महानगरपालिका आपल्या ताब्यात ठेवण्यासाठी उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे या दोन भावांना आपसातील मतभेद विसरून एकत्र यावे लागले. शिवसेना उबाठा आणि राज ठाकरेंची मनसे सोबत लढले. पण, मराठी आणि अदानीच्या नादात त्यांना निवडणुकीसाठी काय करावे लागते, याचे विस्मरण झाले असावे. राज ठाकरे यांना सोबत घेतल्याचा कोणताही फायदा उद्धव ठाकरे यांना झाला नाही. उद्धव ठाकरेंसोबत गेल्याचा फायदा कदाचित राज ठाकरे यांना झाला असेल. देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजित पवार हे राज्यातील महायुतीचे तीन प्रमुख नेते. यात देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांनी आपला राजकीय प्रभाव कायम असल्याचे दाखवून दिले. अजित पवार मात्र स्वत:चा प्रभाव दाखविण्यात अपयशी ठरले. पुणे आणि पिंपरी-चिंचवड या दोन महानगरपालिकांमध्ये अजितदादांचा शिक्का चालायचा. शरद पवारांचेही वजन होतेच. यावेळी राजकीय अस्तित्वासाठी शरद पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस आणि अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र आले होते. त्या एकोप्याचा फायदा झाला नाही. जनतेने भाजपाच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला. निवडणूक प्रचाराच्या काळात अजित पवार आणि भाजपाच्या नेतृत्वात जे आरोप-प्रत्यारोप झाले, ते टाळता आले असते तर बरे झाले असते. अजित पवारांकडून जास्त संयमी वागणुकीची अपेक्षा होती. पण, अपेक्षेप्रमाणे त्यांनी अपेक्षाभंग केला. नको त्या वेळी नको ते बोलून ते स्वत:ला नेहमीच अडचणीत आणत असतात. एका उपमुख्यमंत्र्याचे असे पानिपत झालेले असताना दुसरे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाणे तसेच कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत आपली ताकद दाखवून दिली. नागपूर महानगर पालिकेत भाजपाला मिळालेले यश हे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे या तिघांच्या नेतृत्वाचे यश म्हटले पाहिजे. नागपुरात गडकरी आणि फडणवीस या दोन दिग्गजांची प्रतिष्ठा पणाला लागली होती. नागपूरच्या जनतेने या नेत्यांच्या नेतृत्वावर पुन्हा एकदा विश्वास व्यक्त केला आहे. नागपूरचा निकाल अपेक्षित असाच आहे.

एकंदरीत महानगरपालिका निवडणुकीत भाजपाला मिळालेला विजय म्हणजे विकासाच्या राजकारणावर जनतेने केलेले शिक्कामोर्तब आहे. काँग्रेस, उबाठा गट, शरद पवार गट किंवा अन्य फुटकळ पक्षांना राज्यातील जनता सतत नाकारते आहे. त्यांच्याकडे विकासाचे व्हिजन नाही, निवडणुकीचे नियोजन नाही. ईव्हीएममधील दोष दाखवून प्रचाराचा शुभारंभ करायचा ही रीतच झाली असेल तर विरोधक कधीही जनमताचा कौल मिळवू शकणार नाहीत. सूक्ष्म नियोजन, कठोर अंमलबजावणी व अपार कष्ट यातूनच भाजपाला सतत यश मिळते, हे साधे गणित लक्षात न घेता निरर्थक मुद्यांचे ढोल वाजविण्यात मश्गूल राहिलेल्या विरोधकांनी अर्धनागरी निवडणुका गमावल्या. आता शहरे गमावली. जिल्हा परिषदांमध्ये भाजपा व महायुतीची सुसाट एक्सप्रेस पोहोचेल तेव्हा महाराष्ट्राच्या विकासाच्या गाडीला चौथे इंजिन लागेल. ट्रिपल इंजिन एक्सप्रेस तर निघालीच आहे!

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# नाम रुदाली बाई

पू र्वी एक विचित्र मानसिकता अस्तित्वात होती. अनेक कथा, चित्रपट इत्यादींमधूनही ही मानसिकता दाखवण्यात आली होती. एखाद्या जोडप्याला मूल होत नसेल तर सगळा दोष स्त्रीवर टाकला जायचा. तिला वांझ म्हणून हिणवलं जायचं. केवळ पुरुषच नव्हे तर आजूबाजूच्या स्त्रियाही तिलाच दोष द्यायच्या. पण त्या पुरुषामध्ये काही दोष असू शकतो हे मान्य करायला कुणी तयार नव्हतं. दोष असणं म्हणजे नपुंसकत्व वगैरे अशी भाबडी समज त्या काळी अस्तित्वात होती. पण दोष मान्य करून त्या दोषावर उपचार करता येऊ शकतो आणि 'बाबा'ही होता येऊ शकते. आता मात्र काळ बदललाय. मानसिकताही बदलली आहे. या गोष्टीसाठी केवळ स्त्रीला दोष न देता दाम्पत्य जबाबदारी स्वीकारत त्यावर मात करत आहेत. स्त्रीला सन्मान दिला जात आहे, तिला समानतेने वागणूक दिली जात आहे. ही खरोखरंच एक चांगली बाब आहे. मात्र दुर्दैवाची बाब अशी की राजकीय पटलावरील भारतीय जनता पक्षाचे विरोधक अजूनही त्या जुन्या मानसिकतेत वावरतात. आपल्याकडे वर्षभराच्या अंतराने लोकसभा, विधानसभा आणि मग आता पालिकेच्या निवडणुका लागल्या आहेत. या सर्व निवडणुकांमध्ये तुम्हाला विविध घटक आणि ब्रॅण्ड दिसले असतील. पण एक पॅटर्न बदलला नाही आणि तो म्हणजे रुदाली पॅटर्न. विरोधकांनी एक गोष्ट मनाशी ठरवून ठेवलेली आहे की जर ते जिंकले तर हा त्यांच्या कर्तृत्वाचा परिणाम आहे आणि जर हरले तर ईव्हीएम घोटाळा, व्होट चोरी, शाई पुसली इत्यादी अनेक घटक त्यासाठी कारणीभूत असतात.

आता पालिकांच्या निवडणुकीतही हे रडणारे आपल्याला मोठ्या प्रमाणावर पाहायला मिळाले आहे. विशेष म्हणजे विरोधकांनी केलेले आरोप हे केवळ बालिशच नव्हे तर मूर्खपणाचे होते. भाजपाने ईव्हीएममध्ये आधीपासूनच मते घालून ठेवल्याचा आरोप हा पराकोटीचा मूर्खपणा दाखवणारा होता. आपल्याकडे एक यंत्रणा आहे. ती यंत्रणा इतर देशांपेक्षा अत्यंत सुरळीतपणे सुरू असते. काही त्रुटी नक्कीच आहेत आणि त्यावर कामही झाले पाहिजे. पण इतका मोठा देश असताना ज्याप्रकारे निवडणुकीची प्रक्रिया हाताळली जाते त्याला तोड नाही. त्यामुळे प्रत्येक वेळी यंत्रणेवर दोष लावणे हे लोकशाहीसाठी बाधक आहे. हे ईव्हीएमचे रडगाणे काँग्रेसने २०१४ पासून सुरू केले आहे. त्यानंतर महाराष्ट्रात ठाकरे बंधूंनी हे रडगाणे सुरू ठेवले. त्यानंतर काँग्रेसचे बळजबरीचे युवराज यांनी व्होट चोरी नावाची आणखी एक बोंब मारली. त्यांच्या 'अरे ला हो रे'



करत इतर ठिकाणच्या पक्षांनीही व्होट चोरीचा मुद्दा उचलून धरला. महाराष्ट्रात राष्ट्रवादी काँग्रेस आणि ठाकरेंनी रान पेटवण्याचा प्रयत्न केला पण विधानसभेत भारतीय जनता पक्षाने पुन्हा एकदा विजय खेचून आणला. आता पालिका निवडणुकीत राज ठाकरे व उद्धव ठाकरेंनी मतदारयादींमध्ये घोळ इत्यादी मुद्दे उपस्थित केले. निवडणुकीच्या दिवशीही शाई पुसली इत्यादी वाह्यात नॅरेटिव्ह चालवण्यात आले. या सगळ्या गोष्टींचा हेतू काय? तर मतदारांमध्ये राज्य व केंद्रातील सत्तेविरुद्ध रोष पसरवणं.

एका चॅनलच्या एका तरुण महिला पत्रकाराने तर ठाकरेंसाठी फुल बॅटिंग केली. आपण बातमी देत आहोत की ठाकरेंचा प्रचार करत आहोत, याचाही विसर त्या मुलीला पडला. निवडणुकीच्या दिवशी त्या महिलेने शाई पुसते इत्यादी नॅरेटिव्ह पसरवलं आणि मग सगळे जण मूर्खासारखे शाई पुसणारे व्हिडीओ टाकू लागले. पालिका निवडणुकीसाठी वापरण्यात येणारा मार्कर पेन खूप काळापासून वापरला जात आहे. पण शाई पुसण्याचे उद्योग तेव्हा कोणी केले नव्हते. ती महिला अशी का वागली याचं उत्तर राज-उद्धव यांच्या संयुक्त पत्रकारपरिषदेत दडलंय. राज ठाकरे यांनी पत्रकार परिषदेच्या शेवटी सर्व मराठी पत्रकरांना सहकार्य करण्याचे आवाहन केले. त्यावेळी मी या वक्तव्यावर टीकाही केली होती. कारण सहकार्य करायचे म्हणजे काय करायचे? तर खोटे नॅरेटिव्ह चालवायचे? लोकांमध्ये संभ्रम निर्माण करायचा. इतकं करूनही सत्ता मिळत नाही. राज ठाकरेंनी सत्तेवर प्रश्न उठवला. पण त्यांना मतदारांनी केव्हाच नाकारलं आहे, याची जाणीव त्यांना होत नाही. एक दशक झालं मतदारांनी त्यांच्याकडे पाठ फिरवली आहे.

बरं एक्झिट पोल आल्यानंतरही उद्धव ठाकरेंचा चेहरा पडलेला होता आणि त्यांनी भाजपावर निवडणुकीत घोळ घातल्याचे वक्तव्य केले. ''ठाकरे म्हणजे महाराष्ट्र नाही, ठाकरे म्हणजे मुंबई नाही आणि ठाकरे म्हणजे मराठी माणूस नाही'' असं देवेंद्र फडणवीसांनी सांगितलं होतं. हे ठाकरे मान्य का करत नाहीत? तुम्ही सोन्याचा चमचा तोंडात घेऊन जन्माला येता तेव्हा प्रचंड मोठे गैरसमजही घेऊन जन्माला येता का? बाळासाहेबांना सगळेच जण मान द्यायचे पण तो मान त्यांच्या वंशजांना का मिळावा? त्यासाठी त्यांनी प्रयत्न नको का करायला? निवडणुकीच्या काही दिवस आधी ठाकरेंनी युतीची घोषणा केली. त्यांचे पारंपरिक मतदार सोडले तर या युतीची चर्चा किंवा प्रभाव मुंबईत मला तरी दिसला नाही. केवळ यंत्रणेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करून निवडणूक जिंकता येईल का? केवळ टीका करून, टोमणे मारून लोकांच्या मनात घर करता येईल का? उद्धव ठाकरे भाजपाला फसवून मुख्यमंत्री झाले तेव्हा त्यांना कामे करण्याची नामी संधी लाभली होती. पण त्या काळात भ्रष्टाचाराचा महापूर वाहत होता असे आरोप झाले, गैरकृत्य, गुंडगिरीचं राज्य आल्यासारखे लोक वावरत होते. किती जणांना मारहाण, संशयास्पद मृत्यू आणि काय काय नुसता हैदोस! तुम्ही जर थेट जनतेलाच त्रास देणार असाल तर जनता तुम्हाला का निवडून देईल?

त्या काळात फडणवीस विरोधी पक्षनेते होते आणि ते रस्त्यावर उतरून काम करत होते, पण उद्धव ठाकरे बंगल्यावर बसून होते. हा कार्यकाळ मराठी माणूस कसा विसरेल. या निवडणुकीत काँग्रेस तर केवळ तोंडी लावायला होती. एका व्यक्तीला पंतप्रधान करण्यासाठी, त्याचं राजकीय करीअर बनवण्यासाठी सबंध काँग्रेस पक्षाची वाताहत केली. आता हे सगळे मिळून पुन्हा रडणार आहेत. ''२७ पालिकांमध्ये युतीतल्या कोणत्या तरी पक्षाची सत्ता असेल आणि भाजप नंबर १ असेल.'' हे म्हणणं देवेंद्र फडणवीसांनी खरं करून दाखवलं आहे. पण अजूनही त्यांच्या विरोधकांना आपली चूक कदाचित कळणार नाही. ते रडत राहतील. कधी ईव्हीएमच्या नावाने, कधी व्होट चोरीच्या नावाने, कधी शाई पुसली म्हणून. पण जनता आपल्याला का नाकारतेय याची सतत्या ते पारखून पाहणार नाहीत. असो... मल्लिका शेरावतचं एक गाजलेलं गाणं आहे, नाम जलेबी बाई. या पृष्ठभूमीवर विरोधकही गाणं गात आहेत, ''नाम रुदाली बाई''!

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**पुंडलिक आंबटकर**

# राजकीय आरक्षण विकासाला मारक?

अ नेक वर्षे विविध कारणांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होऊ शकल्या नाहीत. आता नगरपालिकांमध्ये नगराध्यक्ष विराजमान झाले आहेत. महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी मतदान पार पडले असून १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकांची घोषणा आयोगाने केली आहे. महाराष्ट्रातील ३६ जिल्हा परिषदांपैकी ३२ ठिकाणी निवडणूक घ्यायची आहे. मात्र, २० जिल्हा परिषदांनी ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडल्याने येथील निवडणुका लांबल्या आहेत.

दुसरीकडे ३५१ पंचायत समित्यांपैकी अवघ्या १२५ ठिकाणी निवडणुका घोषित करण्यात आल्या. उर्वरित निवडणुकांचे काय? फेब्रुवारी-मार्चमध्ये दहावी-बारावीची परीक्षा असल्याने उर्वरित निवडणुका मे महिन्यापर्यंत लांबणार आहे. दुसरीकडे २७ हजार ९५१ ग्रामपंचायतींपैकी अनेक ग्रामपंचायतींच्या निवडणुका झाल्या नसून १४ हजार २३४ ग्रामपंचायतींची मुदत फेब्रुवारीअखेर संपत आहे. जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांमधील आरक्षणाचा तिढा अद्याप सुटला नसताना लगेच ग्रामपंचायतींच्या निवडणुका घ्याव्या लागणार आहेत. मात्र, या ठिकाणीसुद्धा आरक्षणाची नवीन समस्या उद्भवणार आहे. खरे तर राजकीय आरक्षणामुळे नेमके काय साध्य झाले किंवा होईल, या प्रश्नाचे उत्तर कोणाकडेही नाही. राजकीय आरक्षणामुळे वारंवार कमकुवत उमेदवारांच्या हाती सत्ता जाते आणि मग विकासाचा बोजवारा उडतो.

शासनाने ग्रामपंचायतींना प्रचंड अधिकार दिलेत. १४ व्या वित्त आयोगाने ग्रामपंचायतींच्या खात्यात खोऱ्याने पैसा ओतला. सध्या ३१ मार्च २०२६ पर्यंत १५ वा वित्त आयोग लागू आहे. ग्रामीण भागाचा विकास साधण्यासाठी शासन युद्धस्तरावर प्रयत्नरत आहे. ग्रामीण भागाच्या विकासासाठी तब्बल १ हजार १४० योजना कार्यान्वित असल्या तरीही अनेक गावे विकासापासून वंचित आहेत. यासाठी स्थानिक स्तरावरील कमकुवत राजकीय नेतृत्व आणि निष्क्रिय ग्रामसभा कारणीभूत आहे. बहुतांश गावांमध्ये ग्रामसभा केवळ कागदोपत्री घेतल्या जातात. परिणामी, सरपंच आणि ग्रामसेवकांच्या हाती सत्ता एकवटून भ्रष्टाचाराला प्रोत्साहन मिळते. मागील पाच वर्षांच्या काळात प्रशासकराज होते. या ५ वर्षांत अनेक ठिकाणी अधिकारी-कर्मचाऱ्यांनी मनमर्जी कारभार केला. ज्या अधिकाऱ्यांनी देश प्रथम या न्यायाने कार्यभार सांभाळला त्यांचे अभिनंदन झालेच पाहिजे. मात्र, बहुतांश ठिकाणी रस्त्यांची केवळ डागडुजी करून तसेच वारंवार नाल्या आणि रस्ते फोडून जनतेच्या पैशांचा चुराडा करण्यात आला. अशा कामकाजाबाबत आता नगरपालिका व इतर संस्थांनी संबंधित अधिकाऱ्यांना जाब विचारला पाहिजे. ज्या गावातील नागरिक जागरूक असतात, त्याच गावाचा विकास झपाट्याने होतो. बहुतांश गावांमध्ये मात्र राजकीय आरक्षणाच्या जोरावर निष्क्रिय उमेदवार निवडून येतात आणि मग संबंधित गाव आपोआपच विकासाच्या स्पर्धेतून बाहेर फेकले जाते. जिल्हा परिषद सदस्यांपेक्षाही (राईट ऑफ सरपंच) सरपंचांना अधिकार आहे. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम कलम ३८ अन्वये सरपंचांना विशेषाधिकार मिळाले. पण, ५० टक्के सरपंचांना आपले अधिकार पूर्णत: माहिती नसतात. अशा परिस्थितीत विकास होणार तरी कसा? ग्रामसचिव अर्थात ग्रामसेवक म्हणून शासनाने नियुक्त केलेला सेवक ग्रामपंचायतमध्ये कार्यरत असतो. पण, हा सेवक कधीच मुख्यालयी राहात नाही. तालुका अथवा जिल्हास्थानी राहूनच हे लोक गावविकासाचा गाडा हाकतात. ग्रामीण भागातही शैक्षणिक क्रांती झाली आहे. परंतु, ग्रामसभांना सुशिक्षित तरुणाई उपस्थित राहात नाही. किंबहुना हे आपले कामच नाही, अशी मानसिकता वाढत आहे. त्यामुळे सरपंच आणि ग्रामसेवकांच्या हाती सत्तासूत्रे एकवटतात आणि मग संबंधित गाव आपोआपच विकासापासून दूर सारले जाते. कारण, त्यांना जाब विचारणारा घटकच निष्क्रिय असतो. आरक्षणाच्या जोरावर निवडून आलेले बहुतांश उमेदवार केवळ नामधारी असतात. त्यांच्या नावावर भलतेच लोक सत्ता सांभाळतात. घटनाकारांनी राजकीय आरक्षण केवळ १० वर्षांसाठी लागू केले होते. नंतर केवळ मतांसाठी वारंवार मुदतवाढ देण्यात आली. आज परिस्थिती अशी आहे की, राजकीय आरक्षणाने मर्यादा ओलांडली आणि आयोगाला न्यायालयाच्या आदेशान्वये निवडणुका रद्द कराव्या लागल्या. राजकीय आरक्षणाला विरोध करण्याचे कारण नाही. परंतु, आरक्षणातून सुशिक्षित आणि होतकरू उमेदवार देणे गरजेचे आहे. अन्यथा या आरक्षणाचा हेतू साध्य होण्याची शक्यता कुठल्याही अंगाने वाटत नाही.

९८८१७१६०२७

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# मनपा निकालांचा अन्वयार्थ!

रा ज्यातील २९ महापालिकांच्या निवडणूक निकालांनी केवळ सत्तासमीकरणे बदलली नाहीत, तर राजकारणातील अनेक गैरसमज, आत्ममग्नता आणि चुकीच्या समजुतींचे सारे समज-गैरसमज दूर झालेत. विशेषतः मुंबई महानगरपालिका आणि अन्य महापालिकांच्या निकालांचा अन्वयार्थ पाहता एक गोष्ट ठळकपणे समोर येते 'तुम्ही म्हणजे मुंबई नाही, तुम्ही म्हणजे महाराष्ट्र नाही आणि तुम्ही म्हणजे मराठी नाही' असा स्पष्ट आणि निर्विवाद संदेश राज-उद्धव ठाकरे आणि त्यांच्या पालख्यांचे जे भोई आहेत त्यांना मुंबई आणि महाराष्ट्राच्या मतदारांनी दिला आहे.

गेल्या काही वर्षांपासून मराठी अस्मिता, मुंबईवरील हक्क आणि महाराष्ट्राच्या नेतृत्वाचा दावा हे मुद्दे राज-उद्धव ठाकरे सातत्याने मांडत आलेत. मात्र, हे सगळे दावे खोडून काढत मतदारांनी भावना नव्हे, तर कामगिरी, पर्याय आणि व्यवहार्यतेला प्राधान्य दिले. मराठी माणूस म्हणजे ठाकरेच हा दावा मतपेटीत पूर्णतः फोल ठरवला. मुंबई ही ठाकरे घराण्याची मक्तेदारी असल्याचे ठाकरे मानत होते. मात्र, याच मुंबईने या निवडणुकीत ठाकरेंचा हा दावा सपशेल अमान्य केला. बीएमसीच्या निकालांनी स्पष्ट केले की मुंबईकर आता केवळ नाव, वारसा किंवा भावनिक भाषणांवर मतदान करायला तयार नाहीत.

बाळासाहेब ठाकरे असताना आणि आता नसताना त्यांचे वारसदार असलेल्या ठाकरे कुटुंबाने अनेकदा मुंबईचा आणि महाराष्ट्राचा नैसर्गिक वारसदार म्हणून स्वत:ला प्रोजेक्ट केले. मात्र, महाराष्ट्राचे राजकारण एका कुटुंबाभोवती फिरत नाही, हे या निकालांनी ठामपणे दाखवून दिले. मतदारांनी स्पष्ट केले की नेतृत्व आणि कर्तृत्व हे निवडणुकीत ठरते, जन्माने नाही. या निवडणुकीचा सर्वांत महत्त्वाचा निष्कर्ष म्हणजे मराठी मतदाराचा बदललेला स्वभाव. तो आता भावनिक घोषणांपेक्षा काम, निर्णयक्षमता आणि स्थैर्य पाहतो आहे. ''ठाकरेंचा सेवक तोच नगरसेवक'' अशी घोषणा देण्यात आली होती. मराठी माणूस कोणाच्या मालकीचा नाही किंवा कोणाचा गुलाम, घरगडी नाही, तो स्वतंत्रपणे निर्णय घेतो, हे या निकालांनी अधोरेखित केले आहे. या निकालाचा सर्वांत मोठा अन्वयार्थ म्हणजे मराठी मतदाराचा बदललेला स्वभाव. तो आता कोणाच्या नावावर, आडनावावर किंवा भूतकाळातील आंदोलनांवर मतदान करत नाही. शहरातील रस्ते, पाणी, वाहतूक, आरोग्य, शिक्षण आणि रोजगार हे मुद्दे त्याच्यासाठी अधिक महत्त्वाचे ठरत आहेत.



**'ब्रॅण्ड'चा 'बॅण्ड' वाजला :** वर्षानुवर्षे मुंबईवर अधिराज्य गाजवणारा, मराठी अस्मितेचा स्वयंघोषित किल्लेदार मानला जाणारा 'ठाकरे ब्रॅण्ड'चा या निवडणुकीत 'बॅण्ड' वाजला नव्हे मतदारांनी जाणीवपूर्वक वाजवला आहे. मुळात मुंबई गुजरातला जोडणार, मुंबई महाराष्ट्रापासून तोडणार, मराठी माणसाला संपवणार, मराठी माणसाला खड्ड्यात गाडणार वगैरे भीती १९६५ पासून दाखविण्याचा धंदा शिवसेनेने चालविला आणि आपली राजकीय पोळी शेकून घेतली. ठाकरे ब्रॅण्डची भिस्त ही नेहमीच भावना, अस्मिता आणि वारशावर उभी होती. मुंबई म्हणजे ठाकरे, ठाकरे म्हणजे मराठी माणूस हा समज वर्षानुवर्षे रुजवण्यात आला. मात्र, आता काळाच्या ओघात सगळी समीकरणे बदलत गेली आणि मराठी माणसालादेखील वास्तविकतेची जाणीव होत गेली. या निवडणुकीत मराठी मतदारांनीच हा समज मतपेटीतून नाकारत, 'ब्रॅण्ड'ला कचरापेटीत टाकले. यावेळी ''भावना नाही, तर कामगिरी'', ''घोषणाबाजी नाही, तर प्रशासन'' असा स्पष्ट संदेश या बॅण्डबाजा कंपनीला मतदारांनी दिला.

ठाकरे कुटुंबाने मुंबईला आपली नैसर्गिक मालमत्ता मानण्याची चूक केली. विरोधकांना कमी लेखणे, स्थानिक नेतृत्वाकडे दुर्लक्ष करणे आणि केवळ 'ब्रॅण्ड' व्हॅल्यूवर अवलंबून राहणे, हे सारे घटक या पराभवामागे कारणीभूत ठरले. 'ब्रॅण्ड' जिवंत ठेवण्यासाठी सातत्याने काम करावे लागते, ही साधी राजकीय शिकवण ठाकरे 'ब्रॅण्ड' विसरला. ज्या मराठी मतदार मराठी माणसाच्या नावावर हा 'ब्रॅण्ड' उभा होता, त्यालाच हे लोकं गृहीत धरू लागले होते. निवडणुका आल्या की भीती दाखवायची आणि आपला स्वार्थ साधायचा. असले प्रकार गेली कित्येक वर्षे हे 'ब्रॅण्ड'वाले करत आले आहेत. आता आता तर यांना असं वाटू लागलं होतं की आपण मराठी माणसासोबत काहीही केलं, कसंही वागलं तरी तो आपल्याच खिशात आहे. पण या निवडणुकीने एक महत्त्वाचा राजकीय संदेश दिलाय् मराठी माणूस कोणाच्या खिशात नाही. तो स्वतंत्र आहे, जागरूक आहे आणि गरज पडल्यास तो धडा शिकवू शकतो. 'ब्रॅण्ड'ला इतिहासातजमा करू शकतो, हे मुंबईकरांनी दाखवून दिलं आहे.

**मराठी माणसाची मुंबईतून हकालपट्टी, ठाकरेंची मौजमस्ती :** आज मुंबईतला मराठी तरुण घरासाठी झगडतो आहे, चाळीतून बाहेर पडतो आहे, उपनगरांमध्ये, ठाणे, कल्याण, वसई, विरारच्या पलीकडे ढकलला जात आहे. घरांच्या किमती गगनाला भिडल्या आहेत, भाडं परवडत नाही, नोकऱ्या अस्थिर आहेत. मराठी कुटुंबांना मुंबईतून हाकलले जात आहे. आणि त्याचवेळी राज ठाकरे एका आलिशान बंगल्यातून दुसऱ्या आलिशान बंगल्यात जातात. दुसरीकडे उद्धव ठाकरे 'मातोश्री १' मधून 'मातोश्री २' मध्ये स्थलांतर करताना दिसत आहेत. मराठी अस्मिता, मुंबईवरील हक्क, बाहेरच्यांविरोधातील घोषणाबाजी हे सगळं व्यासपीठावर भारी वाटतं. पण गेल्या २५ वर्षांत प्रत्यक्षात मराठी माणसाच्या घर, रोजगार, शिक्षण, आरोग्य यासाठी काय केलं? याचं उत्तर यांच्याकडे काहीच नाही... मराठी माणूस इतका मूर्ख नाही की तुमचा राजकीय स्वार्थ त्याला कळू नये. आज मुंबईतून मराठी माणूस हळूहळू बाहेर फेकला जात आहे आणि ज्यांनी त्याच्या नावावर राजकारण केलं, ते स्वतः मात्र एका बंगल्यातून दुसऱ्या बंगल्यात जाण्यात व्यस्त आहेत.

त्यामुळे आजचा मराठी मतदार भावनेने नाही, तर अनुभवाने निर्णय घेतो आहे. त्याला कळत आहे की, त्याच्या नावावर सत्ता उपभोगणारे नेते स्वतःच्या आयुष्याची आणि आपल्या वारसांची व्यवस्था करतात. पण सामान्य मराठी माणसाच्या आयुष्याची जबाबदारी घेत नाहीत. घोषणा आणि वास्तव यामधला फरक आता मराठी माणसाला स्पष्ट दिसतो आहे. एका बाजूला सुरक्षित, संरक्षित, ऐश्वर्यसंपन्न बंगल्यांचं राजकारण चालू आहे, तर दुसऱ्या बाजूला मराठी कुटुंबं झोपडपट्ट्यांमध्ये, भाड्याच्या घरांत किंवा मुंबईच्या बाहेर हाकलली जात आहेत. हा विरोधाभास मराठी माणूस रोज जगतो आहे आणि म्हणूनच तो आता फसणार नाही, हे त्याने दाखवून दिले आहे. गद्दार, खोके, खंजीर, कोयते आणि बायकी टोमणे या शब्दांच्या गोंगाटात राजकारण कधीकाळी तापले, पण आता तेच शब्द थकले आहेत आणि जनता विटली आहे. जनतेला शिव्या, उपमा आणि भावनिक ब्लॅकमेल नव्हे, तर दिशा, धोरण आणि विकास हवा आहे. सतत भूतकाळाच्या जखमा कुरतडत बसून, आरोप-प्रत्यारोपांची पुनरावृत्ती करून आणि व्यक्तिगत हल्ल्यांत अडकून राजकारण पुढे जात नाही, हे ठाकरे बंधूंनी समजून घ्यायला हवं. मुंबई, मराठी माणूस आणि महाराष्ट्राच्या प्रश्नांना उत्तर देण्याऐवजी जर अजूनही नाट्यमय भाषणं, टोमणे आणि शाब्दिक तलवारबाजीच सुरू राहिली, तर आत्मपरीक्षणाची संधीही निघून जाईल.

९२७०३३३८८६

## वाचक पत्रे

### वर्तले काय संजया?

| परवीन इनामदार | राष्ट्रवादी | ७४७२ |
| नुसरत शेख | राष्ट्रवादी (शप) | ७८८ |

### प्रभाग २० क

| | | |
|---|---|---|
| अजहर हुंडेकरी | एमआयएम | १२३०४ (विजयी) |
| झीशान सय्यद | भाजप | २६६१ |
| अबूबकर सय्यद | राष्ट्रवादी | ६८३४ |
| सिध्दार्थ रणधीरे | राष्ट्रवादी | ८३९ |
| मंजूर खानापुरे | आप | ३९६ |

### प्रभाग २० ड

| | | |
|---|---|---|
| अझरोद्दीन जहागीरदार | एमआयएम | १०३६६ (विजयी) |
| अमीर शेख | भाजप | २३३४ |
| अझरोद्दीन शेख | काँग्रेस | १७४९ |
| मोहसीन शेख | शिवसेना | ७७२ |
| तौफिक शेख | राष्ट्रवादी | ७३७९ |
| अजहर शेख | आप | २९२ |
| प्रदिप बाळशंकर | अपक्ष | ९३ |
| शाकीर सगरी | अपक्ष | १२५ |
| नय्युम सालार | अपक्ष | २२ |

### प्र.२१ अ

| | | |
|---|---|---|
| संगीता जाधव | भाजप | ६६९१ (विजयी) |
| पूजा खंदारे | शिवसेना | २३८१ |
| प्रतीक्षा निकाळजे | काँग्रेस | ४९८९ |

### प्रभाग २१ ब

| | | |
|---|---|---|
| शिवाजी वाघमोडे | भाजप | ६६९८ (विजयी) |
| रियाज हुंडेकरी | काँग्रेस | ४७८६ |
| अक्षय पकाले | शिवसेना | १९१३ |
| राजकुमार भोसले | अपक्ष | ९२ |
| संजय म्हेत्रे | अपक्ष | २७१ |
| श्रद्धेश पाटील | अपक्ष | ३०९ |

### प्रभाग २१ क

| | | |
|---|---|---|
| मंजिरी किल्लेदार | भाजप | ६९५७ (विजयी) |
| किरण टेकाळे | काँग्रेस | ५०८० |
| मीना दास | शिवसेना | १४८३ |
| ललिता मनसावले | अपक्ष | १४१ |
| ॲड. शर्वरी रानडे | अपक्ष | २८९ |
| बिल्कीस सय्यद | अपक्ष | ११५ |

### प्रभाग २१ ड

| | | |
|---|---|---|
| सात्विक बडवे | भाजप | ७११४ (विजयी) |
| भीमाशंकर म्हेत्रे | ठाकरे गट | ४६९३ |
| संकेत वाघमोडे | वंचित बहुजन आघाडी | ९७५ |
| अमितकुमार अजनाळकर | अपक्ष | ३२७ |
| हणमंता कोटे | अपक्ष | २३६ |
| संतोष भोसले | अपक्ष | ६०६ |

### प्रभाग २२ अ

| | | |
|---|---|---|
| दत्तात्रय नडगिरी | भाजप | ७९१७ (विजयी) |
| संजय हेमगड्डी | काँग्रेस | २८०७ |
| अजित बनसोडे | राष्ट्रवादी | २९३५ |
| सुधीर संगेपाग | शिवसेना | १६६२ |
| सचिन कोलते | एमआयएम | ४७९६ |
| कीर्तिपाल घोडंगुबे | वंचित | ६६१ |
| मधुकर आठवले | अपक्ष | ६६२ |

### प्रभाग २२ ब

| | | |
|---|---|---|
| अंबिका गायकवाड | भाजप | ८०४८ (विजयी) |
| अर्चना जाधव | काँग्रेस | २४९१ |
| अंजू गायकवाड | शिवसेना | २३५३ |
| अंबिका जाधव | राष्ट्रवादी | २९९९ |
| शोभा जाधव | एमआयएम | ५०६७ |
| अपर्णा माने | अपक्ष | ८५ |
| विद्या माने | अपक्ष | ८४ |

### प्रभाग २२ क

| | | |
|---|---|---|
| चैताली जाधव | भाजप | ७४०५ (विजयी) |
| राजनंदा डोंगरे | काँग्रेस | २८८८ |
| अनिता बुक्कानुरे | शिवसेना | २२४९ |
| तहेसीन शेख | राष्ट्रवादी | ३००३ |
| असीया शेख | एमआयएम | ४६६६ |
| सुषमा फडतरे | वंचित | ९६० |
| सुरभी गायकवाड | अपक्ष | १६८ |

### प्रभाग २२ ड

| | | |
|---|---|---|
| किसन जाधव | भाजप | ६८३२ (विजयी) |
| कुणाल गायकवाड | काँग्रेस | २४२६ |
| नितीन गायकवाड | शिवसेना | १६०० |
| जुबेर शेख | राष्ट्रवादी | ३३८१ |
| सिराज शेख | एमआयएम | ४२४७ |
| रमेश सुतकर | वंचित | ८२२ |
| संगणबसप्पा बिराजदार | रिपाइं | ४६ |
| अनिल जाधव | अपक्ष | ४१३ |
| बालाजी जाधव | अपक्ष | ९४ |
| वसंत जाधव | अपक्ष | ४९ |
| शितल गायकवाड | अपक्ष | १४३६ |
| सरफराज शेख | अपक्ष | ११५ |

### प्रभाग २३ अ

| | | |
|---|---|---|
| सत्यजित वाघमोडे | भाजप | ७०७५ (विजयी) |
| अनिल बनसोडे | राष्ट्रवादी | १११६ |
| मदन पोलके | शिवसेना | ४१९० |
| सुनीता रोटे | राष्ट्रवादी (शप) | ४५८१ |
| धर्मराज डुरके | वंचित | ११३५ |
| नवनाथ भजनावळे | अपक्ष | ८२ |
| भारत हत्तीकट्टी | अपक्ष | १५९ |

### प्रभाग २३ ब

| | | |
|---|---|---|
| आरती वाकसे | भाजप | ९२१३ (विजयी) |
| दीपाली शाह | काँग्रेस | ३४१० |
| कृष्णाबाई बिरादार | शिवसेना | ४०३२ |
| मेनका राठोड | अपक्ष | ११०६ |
| सकियाबानो बिराजदार | अपक्ष | ४२४ |

### प्रभाग २३ क

| | | |
|---|---|---|
| ज्ञानेश्वरी देवकर | भाजप | ७८१८ (विजयी) |
| लता गायकवाड | शिवसेना | ४४८१ |
| अलका राठोड | ठाकरे गट | ३७६८ |
| चित्रा कांबळे | राष्ट्रवादी | ११४४ |
| सुगंधा कोळी | बसपा | ८५६ |
| रूपाली चोळ्ळे | अपक्ष | १४८ |

### प्रभाग २३ ड

| | | |
|---|---|---|
| राजशेखर पाटील | भाजप | ७७८२ (विजयी) |
| प्रकाश राठोड | शिवसेना | ३९४६ |
| लक्ष्मण जाधव | ठाकरे गट | ४४६७ |
| राहुल जरग | बसपा | ७८६ |
| सुभाष गायकवाड | वंचित | ७४७ |
| वैभव राऊत | अपक्ष | ६० |
| हरी चव्हाण | अपक्ष | १६१ |
| विजय चोळ्ळे | अपक्ष | ६१ |
| बादशाह शफी | अपक्ष | २५३ |

### प्रभाग २४ अ

| | | |
|---|---|---|
| मधुसूदन जंगम | भाजप | ७४८० (विजयी) |
| शिवलिंग कांबळे | काँग्रेस | ५५७१ |
| सतीश म्हस्के | शिवसेना | २१६४ |
| अभिषेक कटकधोंड | अपक्ष | ६७ |
| संगिता जाधव | अपक्ष | १२१ |
| विपूल थोरे | अपक्ष | १३४ |
| श्रीशैल रणखांबे | अपक्ष | ७७ |
| सातलिंग स्वामी | अपक्ष | २६० |

### प्रभाग २४ ब

| | | |
|---|---|---|
| वनिता पाटील | भाजप | ८५२१ (विजयी) |
| उषा काळे | शिवसेना | ४६०२ |
| चंदा काळे | ठाकरे गट | २२५० |
| रश्मी गायकवाड | अपक्ष | १९२९ |

### प्रभाग २४ क

| | | |
|---|---|---|
| अश्विनी चव्हाण | भाजप | १०३०८ (विजयी) |
| शैलजा राठोड | अपक्ष (शिवसेना पुरस्कृत) | २५६२ |
| रश्मी गायकवाड | अपक्ष | १९२९ |

### प्रभाग २४ ड

| | | |
|---|---|---|
| नरेंद्र काळे | भाजप | ७८३० (विजयी) |
| राजू चव्हाण | काँग्रेस | ३९४३ |
| विकास कदम | शिवसेना | ३१४६ |
| आनंदकुमार जाधव | आप | १५२ |
| विरेश चडचणकर | अपक्ष | २३२ |
| विजय चोळ्ळे | अपक्ष | ६४ |
| विनायक पवार | अपक्ष | ४१ |
| बसवराज बगले | अपक्ष | १६५ |
| श्रुती बंडे | अपक्ष | ९१ |
| संपन्ना दिवाकर | अपक्ष | ११६ |

### प्रभाग २५ अ

| | | |
|---|---|---|
| सुमन चाबुकस्वार | भाजप | ६०१८ (विजयी) |
| सरस्वती आठवले | काँग्रेस | २७६६ |
| सुरेखा काळे | राष्ट्रवादी | ४७०६ |

### प्रभाग २५ ब

| | | |
|---|---|---|
| वैभव हत्तूरे | राष्ट्रवादी | ५१२८ (विजयी) |
| नागेश ताकमोगे | भाजप | ४८३९ |
| विजयकुमार हत्तुरे | काँग्रेस | १८७५ |
| धनंजय कारंडे | शिवसेना | १५४५ |
| मकबुल मुल्ला | प्रहार | ६२ |
| चंद्रकांत नवत्रे | अपक्ष | १६ |
| सिद्धेश्वर माळी | अपक्ष | ५२ |
| अब्दुल मुल्ला | अपक्ष | ६२ |

### प्रभाग २५ क

| | | |
|---|---|---|
| वैशाली भोपळे | भाजप | ४९५४ (विजयी) |
| रिझवान सगरी | काँग्रेस | १८८२ |
| सुकेशनी गंगोडा | राष्ट्रवादी | ४२४५ |
| शोभा चौगुले | शिवसेना | २३०९ |
| शारदा बिराजदार | अपक्ष | १५४ |
| अर्चना साळुंके | अपक्ष | ११७ |

### प्रभाग २६ अ

| | | |
|---|---|---|
| संगीता जाधव | भाजप | ८९४६ (विजयी) |
| किरण सर्वगोड | राष्ट्रवादी | १५०९ |
| नागिणी इरकशेट्टी | राष्ट्रवादी (शप) | ११९४ |
| संगीता सुरवसे | वंचित | ५९१ |
| पल्लवी कांबळे | बीएसपी | ४४८ |
| निशिगंधा भडकुंबे | अपक्ष | ११५३ |

### प्रभाग २६ ब

| | | |
|---|---|---|
| दीपक जमादार | भाजप | ९८३१ (विजयी) |
| रविकुमार यलगुलवार | काँग्रेस | २६३१ |
| राजेश काळे | अपक्ष | ३९८ |
| अरूण मोरे | अपक्ष | ७०० |

### प्रभाग २६ क

| | | |
|---|---|---|
| जयकुमार माने | भाजप | ८३३३ (विजयी) |
| नितीन घुगे | काँग्रेस | १६७९ |
| सागर हत्तुरे | राष्ट्रवादी | १३८८ |
| सुहास सुरवसे | बसपा | ८०३ |
| प्रिया परदेशी | अपक्ष | ९३ |
| प्रेम राठोड | अपक्ष | ७९ |
| श्रीशैल हिरेठ | अपक्ष | १६४९ |



# आठ, नऊ मध्ये भाजपची एक हाती सत्ता तर चौदामध्ये एमआयएमची पतंग उडाली





**▸ खांद्यावर घेत, गुलाल उधळत उमेदवारांच्या सहकाऱ्यांनी केला जल्लोष**

**▸ जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांना करावा लागला सौम्य लाठीचार्ज**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिका निवडणुकीचे धक्कादायक निकाल समोर येत आहेत. भाजपने एकहाती सत्तेची घोडदौड सुरूच ठेवली आहे. भाजप सुसाट वेगाने पुढे जात असताना प्रभाग १४ मध्ये ब्रेक लावण्याचं काम एमआयएमने केले आहे. मुस्लिम बहुल मतदारसंख्या असलेल्या प्रभागात प्रभाग १४ मध्ये एमआयएमचे सर्व पॅनल विजयी झाले आहेत. प्रभाग ८, ९ व १४ च्या प्रत्येकी तीन फेऱ्या झाल्या. तिन्ही फेऱ्यांचा निकाल लागताच दोन्ही पक्षांकडून जल्लोष करण्यात आला.

प्रभाग आठ, नऊ व १४ ची मतमोजणी ही शासकीय तंत्रनिकेतन अक्कलकोट रोड येथे होती. सकाळी दहा वाजताच्या सुमारास मतमोजणी प्रतिज्ञा घेत सुरुवात करण्यात आली. १४ प्रभागात एमआयएमचे पॅनल आल्यानंतर उमेदवाराचे भाऊ व सहकाऱ्यांनी मिळून मोठ्या प्रमाणात जल्लोष केला. हा जल्लोष करत असताना रस्त्याची वाहतूक बंद झाल्याने पोलीस प्रशासनाकडून सौम्य लाठीचार्ज करत जमाव पांगण्याचे काम केले व आव्हान केले की वाहतुकीस अडथळा होऊ देऊ नका. प्रभाग आठ मध्ये अमर पुदाले, गीता गवई, बबिता धूम्मा, प्रवीण दर्गोपाटील, प्रभाग नऊ मध्ये शेखर इगे, कादंबरी मंजेली, पूजा वाडेकर, मेघना येमूल आणि प्रभाग चौदा मध्ये अजहर हुंडेकरी, अजहर जहागीरदार, सफिया चौधरी, अनिसा मोगल यांचा विजय झाला.

### निवडून येईल असं वाटलं नव्हतं

उच्च शिक्षित असलेल्या अनिसा मोगल यांनी पहिल्यांदाच नशीब अजमावले होते. कोणत्याही राजकीय परिस्थितीचा वारसा नसलेल्या अनिसा मोगल यांनी माध्यमां समोर प्रतिक्रिया दिली. निवडून येईल असं वाटलं नव्हतं, कारण अनेक दिग्ग्ज नेते आमच्या समोर होते. राष्ट्रवादीच्या नेत्यांनी अनेक सभा घेत मुस्लिम मतदारांची दिशाभूल केली. त्यातून एमआयएमच्या संपूर्ण पॅनलचा विजय झाला म्हणत त्यांना अश्रू अनावर झाले. अनिसा मोगल या पोलीस पत्नी आहेत. त्यांनी विजयानंतर पतीला व्हिडीओ कॉल करत ही बातमी दिली.

# अमोलबापू शिंदे, चेतन नरोटेंनी राखला गड

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ जानेवारी-**

सोलापूर शहर, जिल्ह्याचेच नव्हे तर राज्याचे लक्ष लागलेल्या सोलापुरातील प्रभाग ७ च्या निवडणुकीत अखेर शिवसेनेचे अमोलबापू शिंदे यांनी गड राखत प्रभागातील चारपैकी तीन उमेदवार सेनेचे विजयी केले आहेत तर मनिषा कणसे यांचा पराभव झाला आहे. प्रभाग १५ मधील काँग्रेसचे गटनेते चेतन नरोटे विजयी झाले तर प्रभागातील त्यांचे इतर तीन सहकारी पराभूत झाले आहेत.

सोलापूर महानगरपालिकेच्या झालेल्या निवडणुकीत सिहंगड महाविद्यालयात शुक्रवारी झालेल्या मतमोजणीमध्ये प्रभाग पाच व सहामध्ये भाजपच्या उमदेवारांनी वर्चस्व प्राप्त केले. प्रभाग सातमध्ये शिवसेनेचे अमोलबापू शिंदे, अनिकेत पिसे, मनोरमा सपाटे या तिघांनी विजय मिळवला तर एका जागेवर भाजपच्या श्रद्धा पवार यांनी विजय मिळविला. त्यांनी सेनेच्या मनिषा कणसे यांचा पराभव केला. प्रभाग पंधरामध्ये तीन जागेवर भाजपने तर एका जागेवर काँग्रेसने निसटता विजय मिळविला. काँग्रेसचे चेतन नरोटे विजयी झाले तर भाजपाचे विनोद भोसले, श्रीदेवी फुलारे, विजया खरात यांनी बाजी मारली.

### प्रभाग सातमध्ये शिवसेनेचे तीन तर प्रभाग १५ मध्ये भाजपाचे तिघे विजयी





प्रभाग पाचमध्ये भाजपाच्या समाधान आवळे, अलका भंवर, मंदाकिनी तोडकरी व बिज्जू प्रधाने या चारही उमेदवारांनी पहिल्या फेरीपासूनच आघाडी घेत बाजी मारली. आवळे यांनी राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आनंद चंदनशिवे यांचा अलका भंवर यांनीही अजित पवार गटाच्याच भाग्यश्री काळे यांचा तर मंदाकिनी तोडकरी यांनी अपक्ष उमेदवार सरस्वती सुरवसे यांचा तर बिज्जू प्रधाने यांनी अजित पवार गटाच्याच गणेश पुजारी यांचा पराभव केला.

प्रभाग सहामध्ये भाजपाच्या सोनाली गायकवाड, सुनिल खटके, मृण्मयी गवळी आणि गणेश वानकर यांनी विजय मिळवला. प्रभागातील शिवसेनेचे मनोज शेजवाळ, पूजा चव्हाण, हर्षल गायकवाड, अनिता गवळी, वंचितच्या कविता उघडे, रेणुका शिराळकर, बसपाच्या भाग्यश्री पांढरे यांचा पराभव झाला आहे.

पान ३ वरुन

## .....८७ जागांवर महाविजय

यंदाच्या निवडणुकीमध्ये भाजपाने निवडणुकीतील प्रचारा दरम्यान केलेल्या 'अब की बार ७५ पार' या घोषणेप्रमाणे घोघवीत यश मिळविले. पक्षाने यंदा अगदी जोमाने प्रयत्न करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री जयकुमार गोरे, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, बाहेरून आलेले आमदार पडळकर, अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी, पक्षाचे पदाधिकारी यांच्यासह स्थानिक आमदार देवेंद्र कोठे आमदार विजयकुमार देशमुख आणि आमदार सुभाष देशमुख आणि इतरांनी मोठा जोर लावला.

**गत वेळेपेक्षा भाजपाने यंदा ३८ जागा अधिकच्या जिंकल्या**

विजयश्री खेचून आणतानाच पक्षाने गत वेळेपेक्षा यंदा तब्बल ३८ जागा अधिकच्या पदरात पाडून घेतल्या. एमआयएमला जरी एका जागेचा फटका बसला तरी पक्षाने यंदाच्या भाजपा लाटेतही चमकदार खेळीसह ८ जागा पुन्हा पदरात पाडून घेतले. शिवाय महापालिकेतील दुसरा मोठा पक्ष देखील ठरला आहे. यंदा निवडणुकीत महायुतीमधील शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाला मोठा दणका बसला आहे. गतवेळी शिवसेनेच्या २१ जागा होत्या. यंदा शिवसेनेच्या रूपाने १७ जागांवर फटका बसला आहे. तर राष्ट्रवादीत काँग्रेस अजित पवार गटाला 'नशिबाने' आपले खाते उघडता आले. गतवेळी राष्ट्रवादी पक्षाला चार जागा मिळाल्या होत्या यंदा एकावर समाधान मानावे लागले आहे. काँग्रेस पक्षाचीही अत्यंत दयनीय अवस्था होऊन पक्षाचा सुफडा साफ झाला. त्यांना गत वेळेच्या चौदा जागांवरून थेट २ जागांवर समाधान मानावे लागले आहे. याद्वारे पक्षाची अब्रू वाचल्याचे आता बोलले जात आहे. गतवेळी चंदनशिवे यांच्या रूपाने चार जागा मिळालेल्या बसपाला यंदा ते राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गेल्यानंतर त्यांच्या पराभवासह त्या पक्षालाही १८ जागांवर उमेदवारी दिलेली असताना एकाही जागेवर उमेदवार निवडून आणता आले नाही. माजी आमदार नरसय्या आडम यांनाही आपल्या पत्नीच्या रूपातील एक जागा गमवावी लागली.

**भाजपा उमेदवार निवडून आल्या जेलमधून !**

महापालिका निवडणुकीसाठी दाखल उमेदवारी अर्ज मागे घेण्यावरून आणि झालेल्या वादातून प्रभाग क्रमांक दोन मधील परिसरात मनसे युवक विद्यार्थी सेनेचे अध्यक्ष बाळासाहेब सरवदे यांचा खून झाला होता. या प्रकरणात प्रभाग क्रमांक २ मधील भाजपा उमेदवार शालन शिंदे यांच्यासह इतरांवर गुन्हा दाखल होऊन त्यांना अटक झाली होती. सध्या ते न्यायालयीन कोठडीत आहेत. महापालिका निवडणुकीचा आज निकाल जाहीर झाला आणि भाजपा उमेदवार शालन शिंदे या निवडून आल्या. यापूर्वी जेलमधून अपक्ष उमेदवार रविकांत पाटील हे निवडून आले होते.

**खा. ओवेसींची जादू आणि एमआयएमला ८ जागा**

सोलापूर महापालिका निवडणुकीत गत निवडणुकीप्रमाणे यंदाही एमआयएम पक्षाने २२ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरविले होते. अचानक शहर- जिल्हाध्यक्ष फारुख शाब्दींच्या राजीनामामुळे पक्ष विखुरला असताना एमआयएम पक्षप्रमुख बॅरिस्टर खासदार असदोद्दीन ओवेसी यांनी शहरात दोन प्रचार सभा घेतल्या. त्यांच्या सभांची जादू चालली. यामुळे प्रभाग क्रमांक २० मधील संपूर्ण वातावरण बदलून कलाटणी मिळाली. यामुळेच शहरात एमआयएमच्या पुन्हा ८ जागा येऊन पक्ष दुसऱ्या क्रमांकावरही राहिला आहे.

**माजी महापौर, उपमहापौरांसह मातब्बरांना पराभवाचा धक्का**

महापालिका निवडणुकीतील भाजपा लाटेसमोर कोणीही मातब्बर टिकू शकले नाही. अशावेळी माजी महापौर ॲड. यु. एन. बेरिया, आरिफ शेख, अलका राठोड, मनोहर सपाटे, संजय हेमगड्डी, उपमहापौर दिलीप कोल्हे, राजेंद्र कलंत्री, माजी सभागृह नेता सुरेश पाटील, श्रीनिवास कर्ली, माजी गटनेते तौफिक शेख पैलवान, आनंद चंदनशिवे, रियाज खरादी यांच्यासह अनेक माजी नगरसेवकांचा पराभव झाला.

**ठळक घटना घडामोडी....**

* कलम १२८ नुसार मतदान गुप्ततेबाबत वाचन आणि शपथ घेतल्यानंतर प्रत्यक्षात प्रक्रियेला सुरुवात
* प्रथम पोस्टल मतदानाला सकाळी दहा वाजता प्रारंभ
* प्रत्येक मतमोजणी केंद्रात त्या त्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कामकाज
* सकाळी ११ वाजल्यापासून प्रभागातील उमेदवारांच्या आघाडीचे निकाल पुढे येऊ लागले
* अनेक प्रभागांमध्ये पोस्टल मतांमध्येही 'नोटा' ला मतदान
* अनेक प्रभागांमध्ये मत विभाजनाचा भाजपाला मोठा फायदा
* दुसऱ्या फेरीनंतर पिछाडीवरील उमेदवार, प्रतिनिधींनी मतदान कक्षातून बाहेर पडणे पसंत केले
* मतमोजणी केंद्र बाहेर उमेदवार समर्थकांची मोठ्या प्रमाणात गर्दी; विजय उमेदवार समर्थकांनी केला जल्लोष
* सायंकाळी ५ वाजेपर्यंत जवळपास सर्वच निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून सुरू होती मोजणी



# व्यवसायिक कौशल्यासाठी कठोर परिश्रम करा : कोकळगी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १६ जानेवारी**

व्यक्तिमत्त्वाचा विकास तुम्ही कसे दिसता यावर नसतो तर तुम्ही किती कर्तबगार आहात यावर असतो. म्हणून जीवनात यशस्वी होण्यासाठी व्यवसायिक कौशल्य आत्मसात करून कर्तबगार झाले पाहिजे तर कुटुंबीय व समाज तुमची तारीफ करेल, असे प्रतिपादन ज्युनिअर विभाग प्रमुख सौ.पुनम कोकळगी यांनी केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित सौ. सुरेखा कल्याणशेट्टी उच्च माध्यमिक महाविद्यालयातील बारावी विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ झाला. प्राचार्य डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, प्रा. सलोनी शहा, प्रा. गुरुशांत हपाळे, प्रा.शिवकुमार मठदेवरू, प्रा.शितल टिंगरे उपस्थित होते. जैस्वाल, चव्हाण, सोलनकर, बेडगे, त्रिगुळे, धर्मसाले, चिक्कमळी, तानवडे या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले.

परीक्षा पद्धत कठीण असते. वाचन, चिंतन व सराव करून प्रश्नांची उत्तरे लिहिली तर गुणांकन वाढते.शिक्षण घेत असताना ध्येय निश्चित करून कठीण परिश्रम घेत व्यवसायिक कौशल्य आत्मसात केल्यास परीक्षेत यश मिळते. असा कानमंत्र मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी यांनी यावेळी दिला. जयश्री तोळणुरे यांनी प्रास्ताविक केले.

प्रसन्न पवार यांनी सूत्रसंचालन केले. मयूर देशमुख यांनी आभार मानले. प्रा. हर्षदा गायकवाड, विजयालक्ष्मी वाले, शितल फुटाणे यांनी प्रयत्न केले.

# य.च.महाविद्यालयात एक दिवसीय NEP अभ्यासक्रम कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर दि.१६ जानेवारी**

यशवंतराव चव्हाण महाविद्यालय करमाळा व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने बी.ए भाग २ अर्थशास्त्र व इतिहास आणि बी.कॉम. भाग २ या वर्गाच्या विषयाच्या नवीन शैक्षणिक धोरणानुसार सुधारित अभ्यासक्रमावर विदापीठस्तरीय एक दिवसीय कार्यशाळा संपन्न झाली या कार्यशाळेचा उद्घाटन सोहळा महाविद्यालयाच्या विजयश्री सभागृहात संपन्न झाला.

या कार्यशाळेचे उद्घाटन सावित्रीबाई फुले, माँसाहेब जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन विद्या विकास मंडळाचे सचिव आदरणीय विलासराव घुमरे सर, दयानंद महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. विजय उबाळे, मिलिंद फंड सर, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ .अभिमन्यू माने यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ विजय उबाळे म्हणाले की, अभ्यासक्रम तयार करताना पारंपरिक आणि नाविन्यपूर्ण कल्पना यांचा वापर करण्याचे आवाहन केले. विलासराव घुमरे, प्राचार्य डॉ. अभिमन्यू माने



डॉ. विष्णू वाघमारे, डॉ. अमोल खाडे डॉ. श्रीकांत दुधाळ, डॉ. शशिकांत शिंदे यांनी मार्गदर्शक केले. प्रा.डॉ. अनिल साळुंके यांनीही मनोगत मांडले. उप प्राचार्य अनिल साळुंखे, अर्थशास्त्र विभाग प्रमुख कृष्णा कांबळे, प्रा.डॉ. अंकुश करपे, प्रा. सुपेकर, इतिहास विभाग प्रमुख प्रा. सरला चव्हाण, प्रा.डॉ. बळीराम जाधव, प्रा. चारु देवकर ,प्रा. हर्षद जाधव, प्रा. ऋषी माने यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रा. नितीन तळपाडे यांनी केले तर आभार प्रा.डॉ. विजया गायकवाड यांनी मानले. या कार्यशाळेस विविध महाविद्यालयाचे प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

# शासकीय चित्रकला ग्रेड परीक्षेत लक्ष्मीबाई कन्या प्रशालेचे यश

**तब्बल २८ विद्यार्थिनींनी मिळवली श्रेणी**

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १६ जानेवारी-**

कला संचालनालय महाराष्ट्र राज्य वतीने शैक्षणिक वर्ष २०२५- २६ मध्ये घेण्यात आलेल्या एलिमेंट्री व इंटरमिजिएट चित्रकला ग्रेड परीक्षा मध्ये शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज संचलित लक्ष्मीबाई कन्या प्रशाला, यशवंतनगर चा निकाल १०० टक्के लागला. एलिमेंटरी ग्रेड परीक्षेसाठी प्रशालेतील एकूण ३७ विद्यार्थिनी व इंटरमिजिएट ग्रेड परीक्षेसाठी एकूण ३७ विद्यार्थिनी परीक्षेला बसल्या व या सर्वच्या सर्व ७४ विद्यार्थिनी पास झाल्या, प्रशालेचा निकाल १०० टक्के लागला.



तृप्ती काळे, अनुप्रिया गाडे, अनुष्का खुडे ,दामिनी यादव जानवी जगदाळे, निशिगंधा तोरसकर, नियती खुडे, परिणीती कोयले, ऋतुजा कांबळे, समृद्धी ठवरे, समृद्धी करगळ, शांभवी चव्हाण, श्रद्धा राऊत, तेजल लोखंडे या विद्यार्थिनी एलिमेंटरी ग्रेड परीक्षेत 'अ' श्रेणीने उत्तीर्ण झाल्या व आरती ननवरे, अहिल्या काळे, ऐश्वर्या काळे, अंजली खरात, अनुष्का कोकाटे, अयोध्या मदने, भावना रणदिवे, दिया माने, रुद्राक्षी काळे, सई रणनवरे, तेजश्री ननवरे, वैष्णवी सुळे ,विद्या माने ,विशाखा बुरुटे या विद्यार्थिनी इंटरमिजिएट ग्रेड परीक्षेत अ श्रेणीत पास झाल्या.

२८ विद्यार्थिनी या अ श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाल्या.२१ विद्यार्थिनी ब श्रेणीमध्ये व २५ विद्यार्थ्यांनी क श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाल्या. सर्व यशस्वी विद्यार्थिनींना प्रशालेत प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. शिक्षण प्रसारक मंडळाचे मार्गदर्शक संचालक जयसिंह मोहिते-पाटील, संस्थेचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील, संस्थेच्या संचालिका तथा प्रशालेच्या सभापती स्वरूपाराणी मोहिते-पाटील, सचिव अभिजीत रणवरे , खराडे साहेब तसेच प्रशाला समितीचे सर्व सदस्य,मुख्याध्यापिका अनिता पवार यांनी यशस्वी सर्व विद्यार्थिनींचे कौतुक व अभिनंदन केले. यशस्वी सर्व विद्यार्थिनींना प्रशालेचे चित्रकला शिक्षक विशाल लिके यांचे मार्गदर्शन लाभले.



# करमाळा शहरात अस्वच्छतेमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा,दि.१७ जानेवारी-**

करमाळा शहरातील सिद्धार्थ नगर भागात सध्या मोठ्या प्रमाणात अस्वच्छता पसरली आहे. गटारी गाळ आणि घाणीने भरले असून सांड पाणी साचले आहे. या घाणीमुळे सिद्धार्थ नगर परिसरात दुर्गंधी पसरली असून डास आणि जंतूंचा प्रादुर्भाव वाढला आहे. यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

या समस्येकडे करमाळा नगरपरिषदेच्या अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले आहे. तसेच सांडपाणी आणि कचरा व्यवस्थापनाची मागणी नागरिकांनी केली आहे साचलेल्या सांडपाण्यामुळे परिसर दुर्गंधमय झालाआहे आणि नागरिकांना, महिलांना व वृध्दांना ये-जा करण्यास प्रचंड त्रास होत आहे. वारंवार तक्रार करूनही प्रशासनाकडून कोणतीही कार्यवाही झालेली नाही तरी करमाळा मुख्याधिकाऱ्यांनी जातीने लक्ष घालून या अस्वच्छतेची समस्या दूर करावी अशी नागरिकांनी आशा व्यक्त केली आहे

# २०१७ च्या तुलनेत मताची टक्केवारी घटली; मात्र मतदान वाढले

**५३.०२ टक्के झाले मतदान तर ८९ हजार ७७२ इतके मतदान वाढले**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ जानेवारी-**

सन २०१७ मध्ये झालेल्या सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीत ५९.४ टक्के मतदान झाले होते तर यंदाच्या महापालिका निवडणुकीत ५३.०२ टक्के मतदान झाले आहे वरवर पाहता टक्केवारी घटली असल्याचे दिसून येते मात्र ८९ हजार ७७२ इतके मतदान वाढले आहे.

सन २०१७ च्या निवडणुकीत एकूण सहा लाख ७३ हजार ९४२ एकूण मतदार संख्या होती तर सन २०२६ च्या या निवडणुकीत ९ लाख २४ हजार ७०६ इतकी मतदार संख्या आहे. ४ लाख ५७ हजार ०९९ पुरुष तर चार लाख ६७ हजार ४७१ महिला आणि इतर १३६ मतदार आहेत. मागील निवडणुकीच्या तुलनेत दोन लाख ५० हजार ७६४ इतके मतदार वाढले असल्याचे दिसते.



यंदाच्या निवडणुकीत दोन लाख ४८ हजार ८९४ पुरुष दोन लाख ४१ हजार ३२९ महिला आणि ५३ इतर मतदारांनी असे मिळून एकूण चार लाख ९० हजार २७६ (५३.०२ टक्के)मतदारांनी मतदान केले आहे. मतदार संख्या वाढली असतानाही विविध कारणास्तव मतदानात घट झाली असल्याचे स्पष्ट आहे.

सन२०१२ च्या निवडणुकीत सन २०१२ च्या मनपा निवडणुकीत ४८ टक्के मतदान झाले होते. ७.३१ लाख मतदार होते. त्यात ३.७८ पुरुष तर ३.५३ लाख महिला मतदार होते. त्यानंतर मतदानात ११.४ टक्के वाढ होत सन २०१७ मधील निवडणुकीत ५९.४ टक्के मतदान झाले होते.

सन २०१७ च्या महापालिका निवडणुकीत १०२ नगरसेवक निवडण्यासाठी ६ लाख ७३ हजार ९४२ मतदार होते. त्यापैकी चार लाख ६०४ मतदारांनी कौल दिला. त्यात दोन लाख १० हजार ६३९ पुरुष तर एक लाख ९० हजार ०३१ महिलांचा समावेश होता. १७ इतर मतदारांपैकी एकानेही मतदान केले नाही. तर प्रदीर्घ प्रशासकीय राजवटीनंतर सन २०२६ मध्ये झालेल्या यंदाच्या निवडणुकीत एकूण ५३.०२ टक्के मतदान झाले आहे.

सन २०१२ च्या महापालिका निवडणुकीत ४८ टक्के मतदान झाले होते. त्यानंतर सन २०१७ च्या निवडणुकीत ११.४ टक्के वाढ होत ५९.४ टक्के मतदान झाले होते. आणि यंदाच्या निवडणुकीत ५३.०२ टक्के मतदान झाले आहे. सोशल मीडियाच्या या युगातही मतदान घटले.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

धाराशिव
# दिनांक
सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## पानगाव येथे घरफोडी; सव्वा लाखांचा मुद्देमाल लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ जानेवारी -**
येरमाळा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पानगाव (ता. कळंब) येथे अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करत सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा एकूण १ लाख ३७ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे.

याबाबत फिर्यादी दत्तात्रय मारुती ठोंबरे (वय ५५, रा. पानगाव, ता. कळंब, जि. धाराशिव) यांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. १४ जानेवारी २०२६ रोजी रात्री ९वाजण्याच्या सुमारास ते दि.१५ जानेवारी रोजी सकाळी १०.३० वाजेपर्यंत त्यांच्या राहत्या घराचे कुलूप अज्ञात व्यक्तीने तोडून घरात प्रवेश केला.




यावेळी २७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने तसेच १७ हजार रुपये रोख रक्कम असा एकूण १ लाख ३७ हजार रुपयांचा माल चोरून नेण्यात आला.

या प्रकरणी फिर्यादी दत्तात्रय ठोंबरे यांनी दि.१५ जानेवारी रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून येरमाळा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून, पुढील तपास येरमाळा पोलीस करीत आहेत.

## संक्षिप्त वृत्त...



### जलशुद्धीकरण केंद्राची काँग्रेस नगरसेवकांकडून पाहणी

**तुळजापूर, दि.१६ जानेवारी -**
तुळजापूर नगरपरिषदेतील विरोधी पक्ष असलेल्या काँग्रेसच्या सर्व नगरसेवकांनी येथील जलशुद्धीकरण केंद्राची पाहणी करून पाणीपुरवठा व्यवस्थेचा आढावा घेतला. दि.१६ जानेवारी रोजी नगरपरिषदेची सर्वसाधारण सभा झाल्यानंतर काँग्रेस पक्षातील नगरसेवकांनी नळदुर्ग रोडवरील फिल्टर जलशुद्धीकरण केंद्राला भेट दिली. बोरी धरणातून येणाऱ्या पाण्याची प्रक्रिया, पाणी शुद्धीकरणासाठी वापरण्यात येणारी ब्लिचिंग पावडर व तुरटी यांची मात्रा, तसेच पाणी स्वच्छ करण्याची पद्धत याबाबत सविस्तर माहिती त्यांनी घेतली. यावेळी काँग्रेसच्या नगरसेवकांनी जलशुद्धीकरण व पाणीपुरवठा प्रक्रियेबाबत समाधान व्यक्त करत काही सुधारणा सुचवून नगरपरिषद कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. या पाहणीवेळी नगरपरिषद काँग्रेस गटनेते अमोल माधवराव कुतवळ, नगरसेवक रणजीत इंगळे, आनंद जगताप, अक्षय परमेश्वर यांच्यासह नगरपरिषदेचे पाणीपुरवठा व जलशुद्धीकरण विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.



### स्वराज्य ध्वजस्तंभ व शिवजयंती सुशोभीकरणाच्या कामाची पाहणी

**धाराशिव, दि.१६ जानेवारी -**
छत्रपती शिवाजी महाराज चौकात उभारण्यात येणाऱ्या ऐतिहासिक स्वराज्य ध्वजस्तंभाच्या कामाची तसेच मध्यवर्ती सार्वजनिक शिवजयंती उत्सवानिमित्त सुरू असलेल्या सुशोभीकरणाच्या कामाची पाहणी मध्यवर्ती शिवजयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष आकाश मिलिंदराव कोकाटे यांनी केली. शिवजयंती उत्सव हा केवळ उत्सवापुरता मर्यादित न ठेवता, छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचे संस्कार समाजमनात रुजावेत, या उद्देशाने यावर्षी विविध सांस्कृतिक, सामाजिक व ऐतिहासिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये सर्वधर्मीय सामुदायिक बिगरहुंडा विवाह सोहळा, समाजजागृतीपर उपक्रम तसेच प्रेरणादायी कार्यक्रमांचा समावेश करण्यात आला आहे. शिवजयंती अधिक अर्थपूर्ण, प्रेरणादायी व स्मरणीय व्हावी, असा निर्धार समितीच्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे. यावेळी मध्यवर्ती सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




### हायस्कूल लोहारा प्रशालेचा शासकीय रेखाकला परीक्षेत १०० टक्के निकाल

**लोहारा, दि.१६ जानेवारी -**
महाराष्ट्र राज्य कलाशिक्षण मंडळ मुंबई यांच्या वतीने घेण्यात आलेल्या शासकीय रेखाकला परीक्षेत लोहारा शहरातील हायस्कूल लोहारा शाळेच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. एलिमेंट्री परीक्षेसाठी ८५ व इंटरमिजिएट परीक्षेसाठी ६१ विद्यार्थी बसले होते. यामध्ये श्रेणी १७ इ श्रेणी ५७ उ श्रेणी ८२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. एलिमेंट्री व इंटरमिजिएट परीक्षेमध्ये ड्रॉइंग ग्रेड परीक्षा सन २०२५ मध्ये उल्लेखनीय यश संपादन केल्याबद्दल सर्व विद्यार्थ्यांचे व कलाशिक्षक व्यंकटेश पोतदार व शिदोरे यांचा प्रशालेतर्फे मुख्याध्यापक डी.एम. पोतदार, शिंदे, गोपाळ सुतार, बचाटे, वैजनाथ पाटील, जट्टे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी या यशाबद्दल सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन व सत्कार करण्यात आला.

## जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांसाठी भाजप सज्ज...

# चार दिवसांत ७१२ इच्छुकांचे अर्ज; महायुतीतून ताकदीने लढणार : दत्ताभाऊ कुलकर्णी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ जानेवारी -**
आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीची संपूर्ण तयारी पूर्ण झाली असून, या निवडणुका महायुतीच्या माध्यमातून ताकदीने लढवण्याची स्पष्ट भूमिका भाजपने घेतली आहे. आमदार राणाजगजितसिंह पाटील, माजी आमदार सुजितसिंह ठाकूर व बसवराज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवडणूक लढवली जाणार आहे.

नगरपालिका निवडणुकांमध्ये मिळालेल्या दणदणीत यशानंतर आता जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांचे वेध लागले असून, त्या अनुषंगाने भाजप कार्यालयात इच्छुकांकडून अर्ज स्वीकारण्यास सुरुवात करण्यात आली आहे. अवघ्या चार दिवसांत पंचायत समितीच्या ११० जागांसाठी सुमारे ३९२ इच्छुकांनी, तर जिल्हा परिषदेच्या ५५ गटांसाठी तब्बल ३२० इच्छुकांनी अर्ज दाखल केले आहेत. अशा एकूण ७१२ इच्छुक अर्जांमुळे भाजपकडून निवडणूक लढविण्यासाठी प्रचंड उत्साह असल्याचे स्पष्ट झाले आहे. दरम्यान, पक्षाच्या वतीने कार्यकर्ता संवाद मेळावे आयोजित करून निवडणुकीची रणनिती आखली जात असून, जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्या व जिल्हा परिषद महायुतीच्या ताब्यात आणण्यासाठी कार्यकर्त्यांनी सज्ज राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. पक्षाकडे मोठ्या प्रमाणावर इच्छुक असले तरी उमेदवारीचा निर्णय वरिष्ठ पातळीवर पारदर्शक पद्धतीने घेतला जाईल.



कोणत्याही कार्यकर्त्यावर अन्याय होणार नाही, असा विश्वासही पक्षाच्या वतीने देण्यात आला आहे. नगरपालिका निवडणुकांमध्ये सर्वांनी एकसंघपणे लढा दिल्यामुळेच ऐतिहासिक यश मिळाले असून, याच एकतेच्या जोरावर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्येही महायुतीचे उमेदवार घवघवीत यश मिळवतील, असा विश्वास भाजप जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे व्यक्त केला आहे.

## धाराशिव शहरातील चोरीचा गुन्हा उघड; तीन आरोपी अटकेत : सुमारे ८० हजारांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ जानेवारी -**
पोलीस अधीक्षक रितु खोखर व अपर पोलीस अधीक्षक शफकत आमना यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेने धाराशिव शहरातील चोरीचा गुन्हा उघडकीस आणत तीन आरोपींना अटक केली असून त्यांच्याकडून सुमारे ७९ हजार ७८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. विनोद इज्जपवार यांच्या आदेशानुसार पथक धाराशिव शहरात पेट्रोलिंग करीत असताना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, पोलीस ठाणे धाराशिव शहर गुन्हा क्रमांक ५७०/२०२५, कलम




३३१(४), ३०५(अ) बीएनएस या गुन्ह्यातील आरोपी स्वप्नील सतीष जेटीथोर, श्वेत सुनील चिलवंत व निखिल किरण सोनवणे (सर्व रा. धाराशिव) हे शहरात फिरत आहेत.

यानुसार पथकाने तात्काळ शोध घेऊन नमूद तिघा आरोपींना धाराशिव शहरातून ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान आरोपींनी कबुली दिली की, सदर गुन्ह्यातील फिर्यादी शुद्धोधन गायकवाड यांनी आरोपींना उसने पैसे दिले होते व त्यावर जास्त व्याज घेत असल्याने आरोपींनी संगनमत करून कुरणेनगर येथील फिर्यादीच्या घरात चोरी केल्याचे त्यांनी मान्य केले. आरोपींच्या ताब्यातून सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा एकूण ७९,७८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

ही कामगिरी सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन खटके, पोलीस हवालदार नितीन जाधवर, बबन जाधवर, चालक पोलीस हवालदार महेबूब अरब व रोहित दंडनाईक यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

## भाजपच्या दणदणीत विजयानिमित्त परंड्यात जल्लोष



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१६ जानेवारी -**
जगातील सर्वात मोठा राजकीय पक्ष असलेल्या भारतीय जनता पक्षाने महाराष्ट्रातील अनेक महानगरपालिका निवडणुकांमध्ये दैदीप्यमान यश संपादन करत अव्वल स्थान पटकावले आहे. या अभूतपूर्व यशाच्या आनंदात भारतीय जनता पक्षाच्या वतीने परंडा येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात जल्लोष साजरा करण्यात आला.

**छत्रपती शिवाजी महाराज चौकात फटाक्यांची आतषबाजी, कार्यकर्त्यांचा उत्साह**

यावेळी भाजपा नेते तथा आमदार मा. सुजितसिंह ठाकूर यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना पेढे भरवून शुभेच्छा दिल्या. कार्यकर्त्यांनी हलगीच्या तालावर नाचत, फटाक्यांची आतषबाजी करत 'भारतीय जनता पार्टीचा विजय असो' अशा जोरदार घोषणा देत परिसर दणाणून सोडला.

या जल्लोष प्रसंगी भाजपा तालुकाध्यक्ष अरविंदबप्पा रगडे, जिल्हा सरचिटणीस ॲड. गणेश खरसडे, युवा नेते व परंडा नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष समरजीतसिंह ठाकूर, सुबोधसिंह ठाकूर, बाबासाहेब जाधव, शहराध्यक्ष उमाकांत गोरे, अविनाश विधाते, ॲड. जहीर चौधरी, विकास कुलकर्णी, तालुका सरचिटणीस धनाजी गायकवाड, शिवाजीराव पाटील, शहाजी आप्पा पाटील, तुकाराम हजारे, सरपंच श्रीराम देवकर, कांतीलाल पाटील, श्रीमंत शेळके, बबनराव चौधरी, अरुण करळे, बाळासाहेब गोडगे, पांडुरंग आप्पा मुसळे, दिव्यांग आघाडी संयोजक तानाजी घोडके, साहेबराव पाडुळे, विलास खोसरे, जयंत सायकर, भारत भोई, महावीर भोई, रविकुमार गरड, धनंजय काळे, मनोहर पवार, गौरव पाटील, अजिम हन्नुरे, संतोष गायकवाड, आकाश मदने, अमर ठाकूर, कार्तीक दीक्षित, तुषार कोळेकर, समाधान कोळेकर, व्यंकटेश दीक्षित, जोती भातलवंडे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## नळदुर्ग नगरपालिकेच्या उपनगराध्यक्षपदी भाजपचे नय्यरपाशा जागीरदार विजयी

**काँग्रेसच्या मारुती खारवे यांचा ३ मतांनी पराभव**

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१६ जानेवारी -**
नळदुर्ग नगरपालिकेच्या उपनगराध्यक्षपदी भाजपचे नय्यरपाशा जागीरदार यांची निवड झाली असून त्यांनी काँग्रेसचे उमेदवार मारुती खारवे यांचा ३ मतांनी पराभव केला. झालेल्या निवडणुकीत नय्यरपाशा जागीरदार यांना १२ तर मारुती खारवे यांना ९ मते मिळाली.

दि.१६ जानेवारी रोजी दुपारी १ वाजता नगरपालिकेच्या सभागृहात नगराध्यक्ष बसवराज धरणे यांच्या अध्यक्षतेखाली उपनगराध्यक्षपदाची निवडणूक पार पडली. यावेळी पिठासीन अधिकारी म्हणून नगराध्यक्ष बसवराज धरणे व नगरपालिकेचे मुख्याधिकारी रामकृष्ण जाधव उपस्थित होते. भाजप-शिवसेना युती तसेच काँग्रेसचे सर्व नगरसेवक सभागृहात उपस्थित होते.

नगरपालिकेतील भाजप-शिवसेना युतीचे संख्याबळ पाहता ही निवडणूक बिनविरोध होईल, अशी शक्यता होती. मात्र काँग्रेसने उपनगराध्यक्षपदासाठी मारुती खारवे यांचा उमेदवारी अर्ज दाखल करत निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला.

**७० वर्षांच्या इतिहासात प्रथमच मातंग व सोनार समाजाला प्रतिनिधित्व...**

नळदुर्ग नगरपालिकेच्या ७० वर्षांच्या इतिहासात प्रथमच स्वीकृत सदस्य पदावर मातंग समाजातील प्रविण धनराज गायकवाड व सोनार समाजातील पत्रकार सुधीर बाबुराव पोतदार यांना प्रतिनिधित्व मिळाले आहे. भाजपने मातंग समाजाला तर काँग्रेसने सोनार समाजाला न्याय देण्याचा प्रयत्न केल्याचे यानिमित्ताने दिसून येत आहे. यावेळी नगरपालिकेच्या सभागृहात तानाजी जाधव व सुधीर पोतदार या दोन पत्रकारांचे नगरसेवक म्हणून प्रतिनिधित्व असल्याचेही विशेष ठरले.




त्यानुसार हात उंचावून मतदान घेण्यात आले असून, भाजपचे नय्यरपाशा जागीरदार उपनगराध्यक्षपदी निवडून आल्याची घोषणा पिठासीन अधिकारी नगराध्यक्ष बसवराज धरणे यांनी केली.

या निवडणुकीत स्वीकृत सदस्य म्हणून भाजपकडून प्रविण धनराज गायकवाड, तर काँग्रेसकडून पत्रकार सुधीर बाबुराव पोतदार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच भाजपचे गटनेते म्हणून दत्तात्रय दासकर, तर काँग्रेसच्या गटनेतेपदी मारुती खारवे यांची निवड करण्यात आली.

निवडीनंतर नगराध्यक्ष बसवराज धरणे यांनी नवनिर्वाचित उपनगराध्यक्ष नय्यरपाशा जागीरदार तसेच स्वीकृत सदस्य प्रविण गायकवाड व सुधीर पोतदार यांचा सत्कार करून स्वागत केले.

उपनगराध्यक्षपदी निवड झाल्यानंतर जागीरदार समर्थकांनी फटाक्यांची आतषबाजी करत जल्लोष केला. तसेच लहुजी शक्ती सेनेचे शहराध्यक्ष प्रविण धनराज गायकवाड यांची स्वीकृत सदस्य म्हणून निवड झाल्याने लहुजी शक्ती सेनेच्या कार्यकर्त्यांनी आनंदोत्सव साजरा केला.

## केशेगाव येथे सोलार कंपनीची वायर चोरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ जानेवारी -**
बेंबळी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील केशेगाव येथे पुरुषोत्तम सोलार कंपनीच्या शेतातील पॉलीकॅब वायर अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे.

याप्रकरणी बेंबळी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## तुळजापूर न.प. उपनगराध्यक्षपदी रामचंद्र रोचकरी यांची निवड



**स्वीकृत नगरसेवकपदी रत्नदीप भोसले व मधुकर शेळके नियुक्त**

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१६ जानेवारी -**
तुळजापूर नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षपदी रामचंद्र सुखदेव रोचकरी यांची बहुमताने निवड झाली असून स्वीकृत नगरसेवकपदी रत्नदीप राजाभाऊ भोसले व मधुकर बबनराव शेळके यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

शुक्रवार दि.१६ जानेवारी रोजी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीनंतरची पहिली सर्वसाधारण सभा पिठासीन अधिकारी तथा नगराध्यक्ष विनोद गंगणे यांच्या अध्यक्षतेखाली नगरपरिषद सभागृहात पार पडली. या सभेस नगरपरिषदेचे सर्व २४ सदस्य उपस्थित होते. पिठासीन अधिकाऱ्यांनी नवनिर्वाचित सदस्यांचे स्वागत करून सभेच्या कामकाजास सुरुवात केली.

उपनगराध्यक्षपदासाठी विहीत वेळेत इंगळे रणजित चंद्रकांत व रोचकरी रामचंद्र सुखदेव यांची नामनिर्देशनपत्रे प्राप्त झाली. छाननीअंती दोन्ही उमेदवारांचे अर्ज वैध ठरविण्यात आले. कोणत्याही उमेदवाराने माघार न घेतल्याने उपस्थित सदस्यांमधून हात उंचावून मतदान प्रक्रिया राबविण्यात आली. यामध्ये इंगळे रणजित चंद्रकांत यांना ५ मते, तर रोचकरी रामचंद्र सुखदेव यांना १९ मते मिळाली. त्यामुळे बहुमताच्या जोरावर रामचंद्र रोचकरी यांची उपनगराध्यक्षपदी निवड झाल्याची घोषणा पिठासीन अधिकारी तथा नगराध्यक्ष विनोद गंगणे यांनी केली.

दरम्यान, स्वीकृत नगरसेवक पदासाठी सभेच्या २४ तास अगोदर जिल्हा सह आयुक्त, नगरपरिषद प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव यांच्याकडे एकूण तीन नामनिर्देशनपत्रे प्राप्त झाली होती. पदनिर्देशित अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, धाराशिव यांनी केलेल्या छाननीनंतर भारतीय जनता पार्टीचे रत्नदीप राजाभाऊ भोसले व मधुकर बबनराव शेळके यांची नामनिर्देशनपत्रे वैध ठरली, तर भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे शेख तौफिक वलीमहंमद यांचे नामनिर्देशनपत्र अवैध ठरविण्यात आले.

त्यानुसार पक्षीय बलानुसार रत्नदीप भोसले व मधुकर शेळके यांची तुळजापूर नगरपरिषदेच्या स्वीकृत नगरसेवकपदी नियुक्ती झाल्याचे जाहीर करण्यात आले.

सभेच्या शेवटी नवनिर्वाचित उपनगराध्यक्ष व स्वीकृत नगरसेवकांचे अभिनंदन करण्यात आले तसेच उपस्थितांचे आभार मानून सभा संपन्न झाल्याचे जाहीर करण्यात आले.

## जवाहर महाविद्यालयात सात दिवसीय 'सॉफ्ट स्किल प्रोग्राम'चा शुभारंभ

# व्यक्तिमत्त्व घडविण्यात नम्रता व मूल्यशिक्षण महत्त्वाचे : कमल शहा

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.१६ जानेवारी -**
जवाहर महाविद्यालयात इंग्लिश क्लबच्या वतीने दि.१६ जानेवारी ते २३ जानेवारी दरम्यान आयोजित सात दिवसीय सॉफ्ट स्किल प्रोग्रामचा उद्घाटन सोहळा मा. कमल शहा यांच्या हस्ते व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.



उद्घाटनप्रसंगी बोलताना कमल शहा म्हणाल्या की, व्यक्ती कितीही मोठ्या पदावर गेला किंवा कितीही संपन्न झाला तरी त्याचे व्यक्तिमत्त्व मूल्यशिक्षण आणि नम्रतेवर ठरत असते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आयुष्यात योग्य वेळी योग्य गोष्टी आत्मसात करून नेहमी नम्र राहिले पाहिजे, असे त्यांनी नमूद केले.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, अशा प्रकारच्या उपक्रमांचा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नेहमीच उपयोग होतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाचा पूर्ण लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकेत इंग्रजी विभागप्रमुख प्रा.डॉ. अनिता मुदकण्णा यांनी सात दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाची सविस्तर माहिती दिली. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी संवाद कौशल्य, व्यक्तिमत्त्व विकास, प्रेझेंटेशन स्किल, ग्रुप डिस्कशन, समीक्षण कौशल्य, सोशल मीडियाचा सकारात्मक वापर, मुलाखत कौशल्य, ताणतणाव व्यवस्थापनासाठी योगा, भावनिक व्यवस्थापन व मूल्यशिक्षण अशा विविध विषयांवर प्रशिक्षण दिले जाणार आहे. यासाठी प्रा.व्ही.जी. माने, डॉ. प्रशांत भागवत, प्रा.डॉ. डी.एन. गटलेवार, प्रा.डॉ.एस.डी. आगलावे, प्रा.डॉ.एस.एस. राऊत हे तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. या उपक्रमासाठी एकूण ६० विद्यार्थ्यांची नोंदणी झाल्याची माहिती त्यांनी दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. विवेकानंद वाहूळे यांनी केले तर आभार डॉ. मानसी स्वामी यांनी मानले.

# रेणापूर नगर पंचायत स्थायी व विषय समिती सभापती निवड जाहीर







**त.भा. वृत्तसेवा,**
**रेणापूर, १६ जानेवारी :** येथील नगर पंचायतच्या स्थायी व विषय समितीच्या सभापती निवड बिनविरोध भाजपाचे चार तर एक सभापती पद काँग्रेसकडे गेले. यामध्ये बांधकाम सभापती मोटेगाकवर सुमन, स्वच्छता वैद्यकीय आरोग्य सभापती खैरूनिसा अत्तार, पाणीपुरवठा व जलनिस्सारण सभापती सरवदे दत्ता, महिला व बालकल्याण सभापती ज्योती चव्हाण, नियोजन व विकास समिती सभापती सुजा-ता सौदागर यांचा समावेश आहे.

रेणापूर येथील नगर पंचायतच्या स्थायी समितीच्या सभापती व सदस्य यांच्या निवडी गुरुवार, दि. १५ जानेवारी रोजी दुपारी चार वाजता पीठासन अधिकारी तह-सीलदार प्रशांत थोरात यांच्या उपस्थितीत झाल्या. स्थायी समिती सभापती म्हणून नगराध्यक्षा श्रीमती शोभा शामराव अकनगिरे तर सदस्य म्हणून खैरूनिसा मारूफ अत्तार, श्रीमती मोटेगावकर सुमन श्रीकृष्ण, सरवदे दत्ता त्रिंबक, श्रीमती चव्हाण ज्योती विजय, श्रीमती सुजाता बाबू सौदागर यांची निवड करण्यात आली. सार्वजनिक बांधकाम समिती सभापतीपदी सुमन श्रीकृष्ण मोटेगावकर यांची निवड झाली.

सदस्य म्हणून आकनगिरे अभिषेक शामराव, शेख रबियाबी शफी, सचिन अनुरथ मोटेगावकर यांची निवड झाली. स्वच्छता वैद्यकीय व आरोग्यसमिती सभापतीपदी खैरूनिसा मारूफ अत्तार यांची निवड करण्यात आली. सदस्य म्हणून हुसेना राशीद शेख, अकनगीरे अभिषेक शामराव, राजश्री संतोष शिंदे, पाणीपुरवठा व जलनिस्सारण समिती सभापतीपदी सरवदे दत्ता त्रिंबक यांची निवड झाली.

समीती सदस्य म्हणून सुनिता मधुकर बस्तापुरे, राठोड प्रदीप ज्योतीराम, चक्रे रुपेश जनार्दन. महिला व बालकल्याण समिती सभापतीपदी ज्योती विजय चव्हाण यांची तर उपसभापतीपदी गाडे धरती महेश यांची निवड झाली. सदस्य म्हणून शेख रबियाबी शफी, मीनाक्षी भूषण पनुरे यांची निवड केली गेली.

नियोजन व विकास समिती सभापतीपदी सुजाता बाबू सौदागर यांची निवड झाली. समीती सदस्य म्हणून गाडे धरती महेश, शेख वाहेद शहाबुद्दीन, राठोड प्रदीप ज्योतीराम निवड करण्यात आली.

या बैठकीस भाजपचे गटनेते अभिषेक अकनगीरे, काँग्रेसचे गटनेते गजेंद्र चव्हाण नगरपंचायतचे मुख्याधिकारी रोहित आरबोळे, प्रदीप पाटील, ज्ञानदेव दहिफळे, अमोल बाजुळगे, अंकुश फड आदी अधिकारी उपस्थित होते. सर्व समितींच्या सभापतींचे स्वागत करण्यात आले.



# निलंगा नगरपालिकेत महिलाराज

## नियोजन समितीसह सर्वच समित्यांवर महिलांची निवड

**त.भा. वृत्तसेवा,**
**निलंगा, १६ जानेवारी :** निलंगा नगरपालिकेसाठी नुकत्याच झालेल्या २०२५-२६ च्या निवडणुकीमध्ये निलंगा विधानसभेचे लोकप्रिय आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर व अरविंद भाऊ पाटील निलंगेकर यांच्या नेतृत्वात भारतीय जनता पार्टी पक्षाने नगराध्यक्ष संजय राज प्रमोद हलगरकर यांच्यासह १५ नगरसेवक निवडून आणून एक हाती सत्ता मिळवली यानंतर निलंगा शहरातील जन-तेने दाखवलेला विश्र्वास व लाडक्या बहिणी व माता-भगिनी यांचा सन्मान करण्यासाठी निलंगा नगरपालीकेतील विविध समित्यांवर महिलांची निवड करुन निलंगा नगर पालीकेवर महिलाराज आणले आहे.

निलंगा नगरपालिकेच्या कारभारामध्ये सुसूत्रता आणण्यासाठी व निलंगा शहर वासियांची सेवा करण्यासाठी स्थायी समितीच्या अध्यक्षपदी विद्यमान नगराध्यक्ष संजयराव हलगरकर तर नियोजन समितीच्या अध्यक्षपदी फुलारी आशा रविशंकर फुलारी, बांधकाम सभापती म्हणून पूजा दत्तात्रय मोहोळकर , पाणीपुरवठा सभापती पदी सोनाली गोपाळराव हाडोळे, स्वच्छता आरोग्य व दिवाबत्ती सभापतीपदी सुधा मारुती वाघमारे, तर महिला व बालकल्याण समितीच्या सभापती पदी मीना-क्षी शरदराव निलंगेकर तर उपसभापतीपदी रंजनाताई कांबळे यांची आज निवड करण्यात आली. . या निवडीबद्दल भारतीय जनता पार्टीचे नेते लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री संभाजीराव पाटील निलंगेकर, युवा नेते अरविंद भाऊ पाटील निलंगेकर तसेच नगराध्यक्ष संजयराज हलगरकर, गटनेते ड विरभद्र स्वामी यांनी त्यांचे अभिनंदन केले. या विषय समितीच्या निवडीच्या वेळी सर्वच नगरसेवक उपस्थित हो-ते. यावेळी अध्यक्ष संजयराज हलगरकर यांच्या अध्यक्षतेखाली पीठासन अधिकारी म्हणून तह-सीलदार प्रसाद कुलकर्णी तसेच मुख्याधिकारी संतोष लोमटे यांनी कामकाज पाहिले.

**महिलाराज आणून लाडक्या बहिणींचा सन्मान**

भारतीय जनता पार्टी व संभाजीराव निलंगेकर हे फक्त निवडणुका जिंकण्यासाठीच लाडकी बहीण योजनेचा वापर करीत नाहीत तर ज्या ज्या वेळेस संधी मिळेल त्या त्या वेळेस लाडक्या बहिणीचा सन्मान व बहुमान मिळवून देण्याचे काम ते करतात. यासाठीच निलंगा शहरातील जनतेने दाखवलेला विश्वास लाडक्या बहिणींचा सन्मान करण्यासाठीच माजी पालकमंत्री संभाजीराव पाटील निलंगेकर व युवा नेते अरविंद भाऊ पाटील निलंगेकर यांनी एक अत्यंत धाडसी निर्णय घेत निलंगा पालिकेचा कारभार करण्याची संधी महिलांना उपलब्ध करून दिली. महिला सुद्धा कोणत्याही क्षेत्रात कमी असणार नाही. भारतीय जनता पार्टी प्रत्येक महिलेचा तितकाच सन्मान करतो जितका पुरुषांचा सन्मान होतो हे दाखवून देण्यासाठी पालिकेचा कारभार सक्षमपणे महिला चालवू शकतात यासाठीच विषय समित्या निवडीच्या वेळी संपूर्ण कारभार महिलांच्या हाती सोपवून पालिकेवर नगराध्यक्ष संजयराज हलगरकर यांच्या अध्यक्षतेखाली महिलाराज आणून खऱ्या अर्थाने निलंगा शहरात लाडक्या बहिणी व माता-भगिनींचा सन्मान करण्याचे काम संभाजीराव निलंगेकर यांनी केले आहे याचे संपूर्ण निलंगा शहर वाशियातून कौतुक केले जात आहे.

# डॉ. विनोद माने राष्ट्रीय युवा चेतना पुरस्काराने सन्मानित



**त.भा. वृत्तसेवा,**
**अहमदपूर, १६ जानेवारी :** पुणे येथील काव्यमित्र संस्थेच्या वतीने दिला जाणारा राष्ट्रीय युवा चेतना पुरस्कार २०२६ हा महात्मा गांधी महाविद्यालयातील प्रभारी क्रीडा संचालक तथा सिनेट सदस्य प्रा. डॉ विनोद माने यांना नुकताच प्रदान करण्यात आला आहे.

यावर्षी महात्मा गांधी महाविद्यालयातील प्रा. डॉ. विन-ोद माने यांचे शैक्षणिक, सामाजिक तसेच क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी लक्षात घेऊन, या संस्थेने त्यांना राष्ट्रीय युवा चेतना पुरस्कार-२०२६ हा पुरस्कार प्रदान केला आहे.

सदरील पुरस्कार वितरण समारंभ हा पुणे येथील सायन्स पार्क पिंपरी चिंचवड येथे तेजस्विनी गलांडे, विजय धोतरे, प्राचार्य सुरेश वाकचौरे, राजेंद्र सगर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये संपन्न झाला.

या पुरस्काराबद्दल विचार विकास मंडळ संस्थेचे अध्यक्ष ॲड. किशनराव बेंडकुळे, सचिव ॲड. पी. डी. कदम, उपाध्यक्ष ॲड.विजयकुमार देशमुख, उपाध्यक्ष युवराज तातेसाहेब पाटील, सहसचिव ॲड. वसंतराव फड, सहसचिव सुरेशराव देशमुख, कोषाध्यक्ष रामचंद्रराव शेळके, विचार विकास मंडळाचे पदाधिकारी, प्राचार्य डॉ. व्ही. पी. पवार, शिक्षक, कर्मचारी यांच्यासह सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

# येरोळ, साकोळ जिल्हा परिषद गटातील इच्छुक उमेदवारांनी जनसंपर्क वाढवला

**त.भा. वृत्तसेवा,**
**शिरूर अनंतपाळ, १६ जानेवारी :** शिरूर अनंतपाळ तालुक्यातील जिल्हा परिषद गटात स्थानिक स्वराज्यच्या निवडणुकीच्या तारखा जाहीर झाल्यापासून येरोळ आणि साकोळ जिल्हा परिषद गटातील इच्छुक उमेदवारांनी जनसंपर्क वाढवून गावोगावी जाऊन मतदार आणि ज्या त्या पक्षाच्या कार्यकर्त्यांना भेटायला सुरुवात केली आहे. त्यामुळे हळूहळू निवडणूकीचे वातावरण निदर्शनास येत आहे. आतापासूनच मतदारांमध्ये संभाव्य उमेदवार कोण असेल, यावरून आराखडे बांधले जात असल्याचे पहावयास मिळत आहे.

कोणतीही सार्वत्रिक निवडणूक म्हटली की, इच्छुक आलेच. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत इच्छुकांची संख्या सर्वच राजकीय पक्षांकडून अधिक असते. यामध्ये संबंधित राजकीय पक्ष त्या-त्या परिसरात नागरिकांमध्ये उत्तम संपर्क असलेल्या चेहऱ्याला संधी देण्याचा प्रयत्न करीत असतात. साकोळ जि.प. गटातून यावेळी सामाजिक संघटनांचे सदस्य उत्तमराव कदम निवडणुकीसाठी संभाव्य उमेदवार असल्याचेही या संदर्भातील चर्चेला उधाण आले आहे.आणि त्यांच्या मार्फत भारतीय जनता पक्षाचे प्रामाणिकपणे काम करुन त्यांनी पक्ष परिवारात एक वेगळा ठसा उमटवून गेले तीस ते पस्तीस वर्षे ते अविरतपणे पक्षाची सेवा केली आहे.त्यामुळे जिल्हा परिषद साकोळ गटातून उत्तम कदम उजेडकर यांना उमेदवारी देण्यात येईल अशी अपेक्षा आहे.

उत्तमराव कदम यांचा प्रवास हा केवळ राजकारणाचा नाही, तर तो जनतेच्या हक्कासाठी लढणाऱ्या समाजसेवकाचा प्रवास आहे. म्हणूनच या परिसरातील जन्मत यांच्या समर्थनात दिसून येत आहे. विद्यार्थी जी-वनापासूनच ते सामाजिक आणि जनहिताच्या प्रश्नांत सक्रिय राहिले आहेत. पत्रकार म्हणून समाजातील दुर्लक्षित घटकांचे प्रश्न, शेतकऱ्यांच्या समस्या, बांधकाम कामगारांच्या वेदना आणि शासनाच्या त्रुटी समाजासमोर आणल्या. त्यांच्या लेखणीचा टोकदारपणा आणि विचारांचा प्रामाणिकपणा हेच त्यांचे सर्वात मोठे बलस्थान आहे. त्यांचे साप्ताहिक उजेड नगरी हे वृत्तपत्र आजही जनतेचा आवाज म्हणून ओळखले जाते.

दि. १० जानेवारी १९८६ रोजी भारतीय जनता पक्षाच्या कार्यात त्यांनी पहिले पाऊल ठेवले. त्या दिवसापासून आजवर ते पक्षाशी निष्ठावान राहिले आहेत. अनुसूचित जाती मोर्चा जिल्हा सरचिटणीस, उपाध्यक्ष, तालुका उपाध्यक्ष अशा अनेक जबाबदाऱ्या त्यांनी अत्यंत जबाबदारीने पार पाडल्या.त्यामुळे त्यांच्या या कार्याची दखल घेऊन पक्षश्रेष्ठींनी त्यांना उमेदवारी दिली पाहिजे असे मत साकोळ जिल्हा परिषद गटातील कार्यकर्ते, तसेच मतदार यांनी सोलापूर तरुण भारत प्रतिनिधीशी बोल-ताना सांगितले.

# नगरपंचायतीच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा पत्रकार संघाच्या वतीने सत्कार

**रेणापूर, १६ जानेवारी :** नगरपंचायतीच्या नवनिर्वाचित लोकनियुक्त नगराध्यक्षा, उपनगराध्यक्षा सह नव्याने निवडून आलेल्या नगरसेवकांचा रेणापूर तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने सत्कार करण्यात आला. या सत्कार सोहळ्यास उपनगराध्यक्षा खैरूनिसा मारूफ अत्तार व काँग्रेसचे गटनेते गजेंद्र चव्हाण यांच्यासह नूतन नगरसेवक सचिन मोटेगावकर, दत्ता सरवदे, राजश्री शिंदे, रबियाबी शेख, हसीना शेख, सुजाता सौदागर, रूपेश चक्रे, प्रदिप राठोड, रमाकांत वाघमारे, शिवाजी पाटील, वाहेद शेख, मधुकर बस्तापूरे, महेश गाडे, भूषण पनुरे यांच्या सह सर्व पदाधिकाऱ्याचा शाल, पुष्प-गुच्छ व डायरी भेट देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी शफी शेख, शिवाजी आकनगिरे, बन्सी देडे, चक्रे सुरज, वंगाटे उपस्थित होते.

# उदगीर नगर परिषदेच्या उपाध्यक्षपदी सौ.शितल शिंदे यांची बिनविरोध निवड

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्विकृत सदस्यपदी तीन सदस्यांची बिनविरोध निवड

**त.भा. वृत्तसेवा,**
**उदगीर, १६ जानेवारी :** नगरपरिषदेची पहिली सर्वसाधारण सभा काल शुक्रवारी दुपारी दोन वाजता नगर परिषदेच्या सभागृहात संपन्न झाली असून, या सभेत उपाध्यक्ष आणि स्वीकृत सदस्यांची निवड करण्यात आली. यामध्ये नगर परिषदेच्या उपाध्यक्षपदी सौ. शितल नरसिंग शिंदे तर स्विकृत सदस्य म्हणून शिवकुमार कांबळे, अनिरुध्द गुरुडे, डॉ.बालाजी बिरादार हे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तर भारतीय जनता पार्टीकडुन सचिन हुडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

नगराध्यक्षपदी सौ. स्वाती हुडे या निवडून आल्या असून या निवडणुकीत भाजपा-राष्ट्रवादी काँग्रेस युतीला स्पष्ट बहुमत मिळाले होते. नगराध्यक्ष पदासह एकूण ३३ नगरसेवक युतीचे निवडून आल्याने नगर परिषदेत युतीची एकहाती सत्ता प्रस्थापित झाली आहे. सभागृहात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे २३, भारतीय जनता पक्षाचे १४, काँग्रेसचे ५ तर एमआयएमचे २



सदस्य असणार आहेत. सभागृहात राष्ट्रवादी काँग्रेसचे संख्याबळ अधिक असल्याने उपाध्यक्षपदासह तीन स्वीकृत सदस्य राष्ट्रवादीकडे, एक स्वीकृत सदस्य भाजपकडे गेले आहे.

उदगीर नगर परिषदेवर माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांच्या नेतृत्वात युतीला मोठे यश प्राप्त झाले होते. आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उपनगराध्यक्ष व तीन स्वीकृत नगरसेवक करुन उदगीर नगरपरिषदेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ताकद वाढली असुन आता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षा-चे एकुण २३ नगरसेवक झाले असल्याने आ.संजय बनसोडे यांचे सर्वस्तरातुन कौतुक होत आहे.

यावेळी माजी आ.गोविंदराव केंद्रे, माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे, नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. स्वाती हुडे, उपनगराध्यक्षा सौ.शितल शिंदे, सुधीर भोसले, बालाजी भोसले, मुख्याधिकारी सोमनाथ जाधव, शाम डावळे, अमोल अनकल्ले, गटनेते अनिल मुदाळे, गटनेते मनोज पुद-ाले, गटनेते मंजुरखाँ पठाण आदीसह सर्व प्रभागातील नगर-सेवक उपस्थित होते. यावेळी नुतन उपनगराध्यक्ष व स्विकृत नगरसेवकांचा आ.संजय बनसोडे यांनी सत्कार करुन शुभेच्छा दिल्या आहेत.

# लातूर महापालिकेवर 'काँग्रेस-वंचित'ची एकहाती सत्ता

**त.भा. वृत्तसेवा,**
**चाकूर, १६ जानेवारी :** ला-तूर महानगर पालिकेवर काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीने ७० पैकी ४७ जागेवर एकहाती विजय मिळवून महानगर पालिकेवर एकहाती सत्ता संपादन केली आहे.यामुळे चाकूर शहरात काँग्रेस पार्टीच्या कार्यालया समोर फटाक्यांची अतिषबाजी करून आणि पेढे भरवून काँग्रेस कार्यकर्त्यांनी आनंदोत्सव साजरा केला.

### चाकूरात फटाके फोडून, पेढे भरवून जल्लोष साजरा

लातुर शहरातील मतदारांनी परोगामी विचारांच्या उमेदवारांना स्पष्ट बहुमन देऊन विजयी केले.कै. शिवराज पाटील चाकूरकर,कै.



विलासराव देशमुख,कै.शिव-ाजीराव निलंगेकर यांच्या विच-ाराला मानणारा मतदार लातूर महानगर पालिकेत असल्यामुळे काँग्रेस-वंचित आघाडीला बहुमत मिळाले आहे.आ.अमित देशमुख व खा.शिवाजी काळगे यांनी महानगर पालिकेवर काँग्रेस पक्षाची एकहती सत्ता मिळविण्यात सिंहा-चा वाटा उचलला आहे.य

यावेळी विलासराव पाटील चाकूरकर, शेख पप्पुभाई, गंगाधर केराळे, सलीमभाई तांबोळी, प्रा.अ.ना.शिंदे, शिवकुमार गाद-गे, वैभव धोंडगे, धनेश्वर रोहीत, रफीक शेख, अझहर सौदागर, मनोज सोनवणे, शुभम टाळकुटे, सरफराज चौधरी,आहाद मचकुरी, तुकाराम साळुंके, जिशान शेख, संगमेश्वर स्वामी, जय भट, वेदांत जाधव, अजित कांबळे, राम सोनवणे, गणेश भोरे, संजय कलिंगरे, व्यंकट माने सह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

जाती-पातीचे राजकारण करून धर्मा-धर्मात तेढ निर्माण करण्याऱ्याला न जुमानता काँग्रेस सोबत सर्व जातीधर्माची जनता भक्कमपणे सोबत असल्याने लातूर महानगरपालिकेत काँग्रेसला एकहाती सत्ता मिळाली आहे. कसल्याच भुलथापाला जनता बळी न पडता लातूरच्या सुजाण मतदारांनी काँग्रेस व वंचित आघाडीला स्पष्ट बहुतम दिले आहे. कै.शिवराज पाटील चाकूरकर, कै.विलासराव देशमुख, कै.शिवाजीराव निलंगेकर यांच्या विचारावर चालणारा लातूर जिल्हा असून लातूर महानगर पालिकेत सर्वसामान्य जनतेच्या हिताचे काम करणाऱ्या नगरसेवकाला जनतेने संधी दिली आहे.

# मिशन वात्सल्य समितीची बैठक संपन्न

**त.भा. वृत्तसेवा,**
**रेणापूर, १६ जानेवारी :** तालुकास्तरीय मिशन वात्सल्य समितीची बैठक नुकतीच नायब तहसीलदार तानाजी यादव यांच्या अध्यक्षतेखाली तहसीलदारांच्या दालनात संपन्न झाली. या बैठकीत एकल महिलांच्या विविध प्रश्नांवर चर्चा झाली.

बैठकीच्या सुरुवा-तीस स्वामी विवेकानंद आणि राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. बैठकीचे प्रास्ताविक रेणापूर तालूका बालविकास प्रकल्प अधिकारी उज्वला देशपांडे यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी महिला बालविकास विभागाच्या वतीने अंगणवाडी कार्यकर्ती, आशा कार्यकर्ती व मदतनीसांच्या परीश्रमातून तालुक्यात एकल महिलांचा सर्व्हे पूर्ण करण्यात आला असल्याचे सांगितले. यात तालुक्यात ५ हजार ३६६ महिलांची नोंद झाल्याचे सांगितले. एकल महिलांत विधवा, परित्यक्ता, घटस्फोटीत महिलांचा समावेश आहे. या एकल महिलांच्या अडचणींवर व समस्यांवर चर्चा करण्यात आली.

यावेळी एकल महिलांच्या कुटुंबातील पाल्यावर ही चर्चा करुन शासनाच्या विविध योजना, रेशनकार्ड नसलेल्या महिला, जातीचे प्रमाणपत्र नसलेल्या महिला, आयुष्यमान कार्ड नसलेल्या महिला, तसेच किती मुलांना बालसंगोपन योजना मिळत आहे. किती मुलांना मिळत नाही, या विषयी चर्चा करण्यात आली. एकल महिलांच्या समस्या सोडवण्याबाबत समितीच्या वतीने प्रयत्न करुन महिला सक्षमीकरणासाठी सर्व विभागांनी निगडीत असलेल्या समस्या सोडवाव्यात, अशा सूचना केल्या. यावेळी विस्तार अधिकारी बी. पी. पाटील, विस्तार अधिकारी अष्टेकर, संरक्षण अधिकारी एस. एच. पवार, आरोग्य विभागाचे टी. एम. आडळकर, शिक्षण विभागाचे एस. आर. देशपांडे, एनजीओ प्रतिनिधी मधुकर गालफाडे यांच्यासह अन्य कर्मचारी उपस्थित होते.

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## श्री सिद्धेश्वर निवासी विद्यालयाची शैक्षणिक सहल संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ जानेवारी -**

ज्ञान आणि मनोरंजनाचा सुरेख संगम साधत श्री सिद्धेश्वर निवासी विद्यालय, वरवंटी यांची दोन दिवसीय शैक्षणिक सहल दि.११ व १२ जानेवारी रोजी यशस्वीरीत्या पार पडली. या सहलीदरम्यान विद्यार्थ्यांनी वेरूळ लेणीतील कैलास मंदिर, घृष्णेश्वर मंदिर, बेबी का मकबरा,



जायकवाडी प्रकल्प तसेच पैठण येथील संत एकनाथ महाराज मंदिर अशा ऐतिहासिक, धार्मिक व पर्यटनस्थळांना भेटी दिल्या.

यावेळी मुख्याध्यापक महादेव कांबळे, सहल विभाग प्रमुख गिरी एम.एन., चौरे (बी.ए.) तसेच शिक्षिका शितल झिंगाडे यांच्या नेतृत्वाखाली ही सहल यशस्वीरीत्या पार पडली. संस्थेचे अध्यक्ष प्रकाशराव मालखरे, अण्णासाहेब जाधव, दिलीप गणेश, ॲड. सुग्रीव नेरे, बी.आर. सूर्यवंशी यांच्यासह इतर पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थी, पालक व शिक्षकांचे अभिनंदन केले.

### संक्षिप्त वृत्त...



## हंद्राळ येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न

**उमरगा, दि.१६ जानेवारी -**

तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, हंद्राळ येथे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चे वार्षिक स्नेहसंमेलन अत्यंत उत्साहपूर्ण व आनंदी वातावरणात पार पडले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दत्ता बिराजदार होते. तर उपाध्यक्ष संदीप हत्तरगी, सरपंच शहाजी कुंभार व उपसरपंच श्रीमती महानंदाताई तांबाळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे उद्घाटन गटशिक्षणाधिकारी अमोल राजपूत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पोलीस पाटील बालाजी मुचळंबे हेही उपस्थित होते. स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध व दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. देशभक्तीपर गीते, लोकगीते, लावणी, नाट्यछटा तसेच विनोदी नकला अशा विविध कार्यक्रमांना प्रेक्षकांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्ञानदेव ममाळे व आनंद मोरे यांनी अत्यंत बहारदार पद्धतीने केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक बालाजी बडूरे यांच्या मार्गदर्शनाखाली राहुल सूर्यवंशी, बसवराज सूनगार व विशाल पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले.



## इटकळ येथे राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती साजरी

**इटकळ, दि.१६ जानेवारी -**

स्वराज्य जननी राजमाता जिजाऊ व युगपुरुष स्वामी विवेकानंद यांची जयंती इटकळ येथील शाळेत विविध उपक्रमांनी व उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पोलीस पाटील कमल मलाय्या स्वामी होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून मुख्याध्यापक प्रकाश कांबळे, उपाध्यक्ष निलुशा जळकोटे, सोमेश्वर स्वामी, उज्वला कांबळे तसेच माता-पालक उपस्थित होते. या दिवशी शाळेतील सर्व मुली राजमाता जिजाऊंच्या वेशभूषेत सहभागी झाल्या होत्या. विशेष बाब म्हणजे संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनींनीच केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षक बालाजी कदम, गोरोबा गायकवाड, बालाजी कुसुमकर, दणाने मॅडम, हब्बू मॅडम, दूधगी मॅडम, क्षीरसागर मॅडम व बागडे मॅडम यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थिनी कुमारी कावेरी राठोड हिने केले, तर आभार प्रदर्शन कुमारी श्रावणी कोळी हिने मानले.

# पारा येथील प्राचीन श्रीराम मंदिराच्या जागेच्या नोंदींमध्ये घोटाळ्याचा आरोप

### जिल्हाधिकाऱ्यांकडे दोन स्वतंत्र तक्रारी दाखल

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१६ जानेवारी -**

धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यातील पारा गावात असलेल्या प्राचीन श्रीराम मंदिराच्या जागेबाबत जमीन नोंदींमध्ये घोटाळा झाल्याचा गंभीर आक्षेप उपस्थित करण्यात आला असून, या प्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांकडे दोन स्वतंत्र तक्रार अर्ज दाखल करण्यात आले आहेत.




तक्रारीनुसार, सदर जागा ही अनेक वर्षांपासून श्रीराम मंदिर व पुजारी यांच्या संयुक्त नावावर नोंदणीकृत आहे. असे असतानाही अलीकडील काळात जमीन नोंदींमध्ये फेरफार करून जागेचा वापर बदलण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा आरोप तक्रारदारांनी केला आहे. या प्रकारामुळे पारा गावात चर्चेला उधाण आले आहे. या प्रकरणी राम मंदिराचे पुजारी ओंकार दत्तात्रय रामदासी यांनीही स्वतंत्र तक्रार दाखल केली असून, त्यात संबंधित जागेबाबत डुप्लिकेट (चुकीचा) ८-अ उतारा तयार करण्यात आल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. सदर जागा अन्य कारणासाठी वापरण्याच्या उद्देशाने जाणूनबुजून चुकीच्या नोंदी करण्यात आल्याचा उल्लेख तक्रारीत करण्यात आला आहे.या दोन्ही तक्रारींसोबत संबंधित ८-अ उतारे, ग्रामपंचायत नोंदवही तसेच अन्य कागदपत्रे पुरावा म्हणून सादर करण्यात आली आहेत. या प्रकरणाची सखोल चौकशी करून मूळ नोंदी पूर्ववत कराव्यात व दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी तक्रारदारांनी केली आहे.

या तक्रारींमुळे पारा परिसरात चर्चा व खळबळ उडाली असून, प्रशासन या प्रकरणात कोणती भूमिका घेते याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

## सुजितसिंह ते समरजित : पत्रकारितेतून राजकारणापर्यंतचा प्रेरणादायी प्रवास

### परंड्यात ठाकूर कुटुंबाची जनसेवेची परंपरा अखंड

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ जानेवारी -**

परंडा तालुक्याच्या राजकीय व सामाजिक जीवनात ठाकूर कुटुंबाने सातत्याने आपली ठळक ओळख निर्माण केली आहे. पत्रकारितेतून सुरू झालेला हा प्रवास पुढे राजकारणापर्यंत पोहोचला आणि आज वडिलांचा अनुभव व मुलाची तरुण ऊर्जा एकत्र येऊन परांड्याच्या विकासाला नवी दिशा देताना दिसत आहे.

माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांनी आपल्या कार्यकाळात राजकीय तसेच सामाजिक बांधिलकीच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावली.



राजकारणात प्रवेश करण्यापूर्वी त्यांनी १९८४ ते १९९४ या कालावधीत 'सोलापूर तरुण भारत' या दैनिकासाठी परांडा तालुका प्रतिनिधी म्हणून सुमारे दहा वर्षे काम केले. या काळात ग्रामीण प्रश्न, शेतकऱ्यांच्या अडचणी, पाणीटंचाई, सामाजिक समस्या व प्रशासनातील त्रुटी त्यांनी प्रभावीपणे मांडल्या. पत्रकारितेमुळे जनतेच्या प्रश्नांची खोल जाण, प्रशासनाची समज आणि समाजाशी थेट संवाद साधण्याची क्षमता त्यांना लाभली.

सुजितसिंह ठाकूर यांनी परांडा नगरपालिकेचे तीन वेळा नगराध्यक्षपद भूषवले. या कार्यकाळात रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, पायाभूत सुविधा तसेच शहर विकासाला त्यांनी प्राधान्य दिले. भारतीय जनता पक्षात जिल्हा व राज्य पातळीवरील अनेक महत्त्वाची पदे भूषवत पक्षवाढीसाठी त्यांनी मोलाचे योगदान दिले. लोकाभिमुख निर्णय, पारदर्शक कारभार व प्रशासनावर मजबूत पकड ही त्यांच्या नेतृत्वाची वैशिष्ट्ये ठरली.

### कार्यकर्ते आणि पक्षनिष्ठा जपणारे ठाकूर

मराठवाडा 'दुष्काळवाडा' म्हणून ओळखला जातो, तर धाराशिव जिल्हा देशातील आकांक्षित जिल्ह्यांमध्ये तिसऱ्या क्रमांकावर आहे. या जिल्ह्यातील परांडा तालुका विकासाच्या दृष्टीने कायमच दुर्लक्षित राहिला आहे. अशा परिस्थितीत विकास साधणे आणि राजकीय पक्ष संघटन मजबूत करणे हे मोठे आव्हान होते. याच परांड्यातून माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांनी नगरपालिका ते राज्यस्तरावर भाजप पक्षासाठी विविध पातळ्यांवर काम करत आपले नेतृत्व सिद्ध केले. आजही भाजपचे अनेक कार्यकर्ते त्यांचा सल्ला व मार्गदर्शन घेतात. जिल्ह्यात भाजप पक्ष वाढीसाठी अहोरात्र झटणारे, पक्षनिष्ठा जपणारे नेतृत्व म्हणून ठाकूर यांच्याकडे पाहिले जाते.

आता हाच जनसेवेचा वारसा पुढे नेत त्यांचे सुपुत्र, युवक नेते समरजित सुजितसिंह ठाकूर यांनी प्रथमच नगरपालिका निवडणुकीत उतरत नगरसेवक म्हणून विजय मिळवला आणि आज ते उपनगराध्यक्षपदी विराजमान झाले आहेत. पहिल्याच निवडणुकीत मिळालेले हे यश म्हणजे नागरिकांचा विश्वास आणि ठाकूर कुटुंबाच्या नेतृत्वावर असलेल्या श्रद्धेची पावती आहे.

वडिलांचा प्रदीर्घ अनुभव आणि समरजित यांची तरुणाईतील ऊर्जा, आधुनिक दृष्टिकोन व लोकाभिमुख विचार यांचा संगम परांड्याच्या विकासासाठी नवे मार्ग खुले करेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. उपनगराध्यक्षपदी निवड झाल्यानंतर नागरिकांच्या समस्या सोडवणे, शहर विकास आणि पारदर्शक निर्णयप्रक्रिया यामध्ये ते सक्रिय राहतील, असा विश्वास नागरिकांमध्ये आहे.

परंड्यातील जनतेने ठाकूर कुटुंबाच्या या सातत्यपूर्ण जनसेवेच्या प्रवासाचे कौतुक केले असून, आधी सुजितसिंह आणि आता समरजित यांच्या माध्यमातून ही परंपरा अखंड सुरू राहिल्याचे स्पष्ट होत आहे. आगामी काळात शहराच्या सर्वांगीण विकासासाठी या नेतृत्वाकडून सकारात्मक आणि प्रभावी कामगिरीची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## रुईभर येथे राज्य क्रीडा दिनानिमित्त विविध क्रीडा स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ जानेवारी -**

जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथे क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, धाराशिव आणि जयप्रकाश विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने राज्य क्रीडा दिनानिमित्त विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.




या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य जयप्रकाश कोळगे होते. प्रमुख अतिथी म्हणून बी.के. नाईकवाडी (जिल्हा क्रीडा अधिकारी, धाराशिव), विश्वास खंदारे (राज्य क्रीडा मार्गदर्शक कबड्डी) तसेच राजकुमार सोमवंशी (खजिनदार, महाराष्ट्र राज्य तलवारबाजी संघटना) हे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी ऑलिम्पिक पदक विजेते खाशाबा दादासाहेब जाधव व हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी श्रीधर सूर्यवंशी यांनीही खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमास प्राचार्य जयप्रकाश कोळगे, प्रशासकीय अधिकारी शिवकन्या साळुंके, प्राचार्य संतोष कपाळे, मुख्याध्यापक नानासाहेब शेलार, पर्यवेक्षक काकासाहेब डोंगरे, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

## मुरुम येथे ४० लिटर गावठी दारू जप्त

**धाराशिव, दि.१६ जानेवारी**

मुरुम पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध मद्यविक्रीविरोधात करण्यात आलेल्या कारवाईत सुमारे ४० लिटर गावठी दारू जप्त करण्यात आली आहे. या प्रकरणी दिगंबर शिवाप्पा देडे (वय ४८, रा. महादेव नगर, मुरुम, ता. उमरगा) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दि.१४ जानेवारी रोजी मुरुम येथे आरोपीकडे अवैध विक्रीच्या उद्देशाने बाळगलेली अंदाजे ४,००० रुपये किंमतीची ४० लिटर गावठी दारू पोलिसांनी जप्त केली.

## उमरगा तालुक्यात जि.प. व पं.स. निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आढावा बैठक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ जानेवारी -**

आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर उमरगा तालुक्यातील जिल्हा परिषद गटातील पदाधिकारी व प्रमुख कार्यकर्त्यांची एक महत्त्वाची आढावा बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीस खा. ओम प्रकाश राजेनिंबाळकर आणि आ. प्रवीण स्वामी यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

बैठकीदरम्यान कार्यकर्त्यांशी संवाद साधताना स्थानिक प्रश्न, जनतेच्या अपेक्षा तसेच संघटनात्मक बांधणी यावर सखोल चर्चा करण्यात आली. गावागावातील प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी कार्यकर्त्यांनी अधिक सक्रिय राहावे, जनतेशी थेट संपर्क ठेवावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना उमेदवार कोणताही असो, त्याला निवडून आणण्याची जबाबदारी सर्वांची आहे. प्रामाणिक काम आणि संघटनाच्या बळावर येणाऱ्या निवडणुकांत घवघवीत यश मिळवू, असा निर्धार व्यक्त करण्यात आला. या बैठकीमुळे उमरगा तालुक्यातील राजकीय हालचालींना वेग आला असून कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या बैठकीस आ. प्रवीण स्वामी, केशव उर्फ बाबा पाटील, दीपक जवळगे, सुलतान शेठ, अमोल बिराजदार, अजित चौधरी, रणधीरभाऊ पवार, सुधाकर पाटील, गुलाब मोरे, विजयकुमार नागने, विजयकुमार तळभोगे, अजित पाटील, धिरज बेळंबकर, शेखर पाटील, सालिम शेख, वहाब अतार, समाने सावकार, विठ्ठल साठे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## वाशी तालुक्यात आचारसंहिता लागू : कायदा व सुव्यवस्था राखण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१६ जानेवारी -**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर वाशी तालुक्यात सध्या राजकीय हालचालींना वेग आला असून, त्या अनुषंगाने वाशी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शंकर शिंदे यांनी नागरिक, मतदार व उमेदवारांना महत्त्वाचे आवाहन केले आहे.

जिल्हा धाराशिव हद्दीत जिल्हा परिषद व पंचायत समिती स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर संपूर्ण जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. निवडणूक प्रक्रिया शांततेत, कायदेशीर चौकटीत व सुव्यवस्थित पार पाडण्यासाठी जिल्हाधिकारी, धाराशिव यांच्या आदेशानुसार जमावबंदी लागू करण्यात आली आहे.

कोणतेही बेकायदेशीर प्रकार आढळून आल्यास संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

## कळंब येथील श्री बालाजी मंदिरात गोदा-रंगनाथ कल्याण उत्सव संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१६ जानेवारी -**

कळंब येथील श्री बालाजी मंदिरात भव्य दिव्य गोदा-रंगनाथ (कल्याण) उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. दि.१३ जानेवारी मंगळवार रोजी श्री गोदा (लक्ष्मी) आणि श्री रंगनाथ (बालाजी) यांचा शुभविवाह हजारो भक्तांच्या साक्षीने भक्तिभावात संपन्न झाला.

या उत्सवाने १६ डिसेंबरपासून सुरू असलेल्या धनुर्मास उत्सवाची सांगता झाली.

मंदिर सभागृहाला आकर्षक रोषणाई, फुलांची तोरणे, केळीची पाने



व रंगीबेरंगी कापडांनी भव्य लग्नमंडपाचे स्वरूप देण्यात आले होते. सायंकाळी चार वाजता श्री रंगनाथ यांची आकर्षक रथातून वरात मिरवणूक वाजत-गाजत निघाली. महिलांच्या लाल साड्या, पुरुषांचे पांढरे कपडे व गुलाबी फेटे यामुळे वरातीत शिस्त व उत्साहाचे सुंदर दर्शन घडले. फटाक्यांची आतषबाजी, फुगडी व गरबा नृत्याने वातावरण अधिक मंगलमय झाले.

लग्नमंडपात पुष्पवृष्टीत वर-वधूंचे स्वागत करण्यात आले.

कन्यादान विधी, विश्वकसेन पूजा, मंगलाष्टके व अक्षता विधी मुख्य पुजारी श्री रामाप्रपन्नाचार्य (मोनूजी महाराज) यांच्या हस्ते पार पडले.

गोदा कल्याणम हा प्रामुख्याने दक्षिण भारतात साजरा होणारा अत्यंत पवित्र उत्सव असून, गोदा देवी (लक्ष्मी) व भगवान रंगनाथ यांच्या दिव्य विवाहाचे प्रतीक आहे. या उत्सवात सहभागी झालेल्या भक्तांना कौटुंबिक सुख, शांती व अविवाहितांना योग्य जीवनसाथी मिळतो, अशी श्रद्धा आहे.

तिरुपती येथील परंपरेनुसार कळंब बालाजी मंदिरात हा उत्सव भव्य प्रमाणात साजरा झाल्याने भाविकांसाठी ही एक पवित्र पर्वणी ठरली.

शुभविवाहानंतर हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. मंदिरात असे पवित्र उत्सव सातत्याने होत असल्याने भक्तांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

## विद्यानिकेतन व आदर्श आश्रमशाळेत 'हिंद की चादर' गुरु तेग बहादूर यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ जानेवारी -**

'हिंद की चादर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गुरु तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहादत वर्षानिमित्त विद्यानिकेतन माध्यमिक आश्रमशाळा व आदर्श प्राथमिक आश्रमशाळा, शिंगोली (ता.जि.धाराशिव) यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी १५ जानेवारी रोजी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात ज्योती राठोड यांच्या हस्ते हिंद दि चादर गुरु तेग बहादूर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.यानंतर



प्रभात फेरी काढण्यात येऊन विविध घोषणा देण्यात आल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रत्नाकर पाटील यांनी केले. ते म्हणाले की, गुरु तेग बहादूर हे सिखांचे नववे गुरु असून त्यांनी अन्याय व अत्याचाराच्या विरोधात आवाज उठवत खंबीरपणे लढा दिला. धर्म व देशाच्या रक्षणार्थ त्यांनी आपले बलिदान दिले.

देशरक्षणासाठी दिलेल्या या महान त्यागामुळेच त्यांना हिंद की चादर ही गौरवशाली उपाधी बहाल करण्यात आली, असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

या कार्यक्रमाला शाळेतील शिक्षक दिपक खबोले, चंद्रकांत जाधव, कैलास शानिमे, पडवळ खंडू, साने ज्योती, सुरेखा कांबळे, श्रद्धा सूर्यवंशी, सुधीर कांबळे, शेषेराव राठोड, सचिन राठोड, बालिका बोयणे, इरफान शेख तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी गोविंद बनसोडे, सागर सूर्यवंशी, संजय मस्के आदी उपस्थित होते.

गुरु श्री गुरु तेग बहादर साहिब जी यांच्या ३५० व्या शहादत समागम वर्षानिमित्त शाळेत चित्रकला व निबंध स्पर्धांचेही आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक रत्नाकर पाटील यांनी केले, तर आभार शिक्षक दिपक खबोले यांनी मानले.

## निवडणूक काळात सार्वजनिक ठिकाणी पोस्टर्स-बॅनर्सवर बंदी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ जानेवारी -**

जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक-२०२६ चा कार्यक्रम जाहीर झाल्याने दि. १३ जानेवारीपासून आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. निवडणूक प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय्य वातावरणात पार पडावी, तसेच सार्वजनिक सुरक्षितता व वाहतूक सुरळीत राहावी, या उद्देशाने सार्वजनिक ठिकाणी व रस्त्यांवर निवडणूक साहित्य लावण्यावर प्रशासनाने निर्बंध घातले आहेत.

राजकीय पक्ष, निवडणूक लढविणारे उमेदवार, त्यांचे प्रतिनिधी किंवा हितचिंतकांकडून सार्वजनिक इमारतींवर अथवा सार्वजनिक रस्त्यांवर पोस्टर्स, बॅनर्स, पॅम्प्लेट्स, कटआऊट्स, होर्डिंग्ज, कमानी आदी निवडणूक साहित्य लावल्यास वाहतुकीस अडथळा निर्माण होण्याची तसेच अपघात होण्याची शक्यता असल्याने अशा कृतींवर निर्बंध घालणे आवश्यक ठरले आहे.

त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३३ (१)(डीबी) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून हे आदेश निर्गमित केले आहेत.

या आदेशानुसार, निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत म्हणजेच दि. ७ फेब्रुवारी २०२६ पर्यंत कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी किंवा सार्वजनिक रस्त्यावर रहदारीस अडथळा होईल अथवा अपघात होण्याची शक्यता निर्माण होईल अशा प्रकारे कोणतेही निवडणूक साहित्य लावण्यास बंदी घालण्यात आली आहे. हे आदेश दि. १३ जानेवारी २०२६ ते दि. ७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत संपूर्ण धाराशिव जिल्ह्यात लागू राहणार आहेत.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## सीआरपीएफ जवानांचा दीक्षांत समारोह-गौरव

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १६ जानेवारी :** ४४ आठवड्यांचे कठीण आणि शिस्तबद्ध प्रशिक्षण पूर्ण केलेल्या केंद्रीय राखीव पोलिस बलातील १ हजार १६६ जवानांचा दीक्षांत सोहळा सोमवारी येथील सीआरपीएफच्या रिकूट प्रशिक्षण केंद्रात उत्साहात पार पडला. यावेळी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या जवानांना गौरविण्यात आले. या सोहळ्यास सीआरपीएफच्या मध्य झोन, कोलकत्ता येथील विशेष महानिदेशक अमित कुमार यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी चाकूरच्या बीएसएफचे पोलिस महानिरीक्षक विनीत कुमार, पोलिस उपमहानिरीक्षक तथा प्राचार्य अमिरुल हसन अन्सारी, कमॉइंट वेद प्रकाश, मुख्य प्रशिक्षण अधिकारी पास नाथ, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, पोलिस अधीक्षक अमोल तांबे आदी उपस्थित होते. या परेडनंतर प्रशिक्षक व प्रशिक्षणार्थ्यांनी शारीरिक क्षमता, सामूहिक समन्वय व युद्ध कौशल्याचे उत्कृष्ट प्रदर्शन करीत बाइक बाढ़कर स्टंट, मल्लखांब, झुंबा, रायफल ड्रिल आदींचे नेत्रदीपक सादरीकरण केले. उपस्थितांनी टाळ्यांचा कहकडाट कौतुक केले.

जवानांना शिस्त, निष्ठा, कर्तव्य तत्परता आणि गौरवशाली परंपरांचे सदैव पालन करावे, असे आवाहन केले. या प्रेरणादायी शपथविधी क्षणी, सैनिकांनी राष्ट्रासाठी प्रामाणिकपणा, सेवा, धैर्य आणि त्यागाची प्रतिज्ञा केली.



# लातूर शहर मनपावर काँग्रेसची सत्ता !

## भारतीय राष्ट्रीय काँग्रेस-वंचित आघाडीने मिळवल्या तब्बल ४७ जागा

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १६ जानेवारी :** संपूर्ण राज्याचे लक्ष लागून राहिलेल्या लातूर शहर महानगरपालिकेवर अखेर काँग्रेसचा झेंडा फडकला. या निवडणुकीत भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने एकूण ६५ जागा लढविल्या होत्या. त्यापैकी ४३ जागा जिंकण्यात काँग्रेसला यश आले. तर वंचित बहुजन

### भारतीय जनता पार्टी २२ तर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला मिळाली एक जागा; आ. अमित देशमुख - आ. संभाजी पाटील निलंगेकरांत देशमुख ठरले सरस

आघाडीला काँग्रेसने पाच जागा दिल्या होत्या. त्यापैकी वंचितने चार जागा जिंकल्या. भाजपने सर्वाधिक ७० जागा लढवूनच त्यापैकी २२ जागा जिंकल्या. अजित पवारांच्या राष्ट्रवादीने ५६ जागा लढविल्या. त्यापैकी त्यांना केवळ एक जागा जिंकता आली. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाला एकही जागा मिळाली नाही. या निवडणुकीत सर्वाधिक अधिक यशाचा टक्का प्रकाश आंबेडकरांच्या वंचितच्या वाट्याला गेला. पाच जागा लढवून त्यांनी चार जागा जिंकून हे यश मिळवले. अपेक्षेप्रमाणे या निवडणुकीत अनेक निकाल धक्कादायक लागले आ-हेत. आ. अमित देशमुख आणि आ. संभाजी पाटील निलंगेकर या दोघांमध्ये आजमितीस देशमुखांचे नेतृत्व प्रभावी ठरल्याची चर्चा लातूरच्या राजकीय वर्तुळात केली जात आहे.

लातूर शहर महानगरपालिकेच्या तिसऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी गुरुवारी एकूण ६०.०८ टक्के एवढे अंतिम मतदान झाले होते. मतदानाच्या आकड्याने साठी





ओलांडल्याचा अंदाज अंतिम आकडेवारी येण्यापूर्वीच सर्वांना आला होता. लातूरचासुजाण आणि चाणाक्ष मतदार आपल्या मनाचा ठाव अखेरपर्यंत लागू देत नाही, याची आज शुक्रवारी निवडणुकीच्या निकालाकडे पाहून आली. सुरुवातीला ही निवडणूक स्थानिक प्रश्नांसह पक्ष नाही तर उमेदवाराचा चेहरा पाहून लढवली जाईल असा कयास होता. काही बाबतीत तो खराही ठरला. प्रत्यक्ष निवडणुकीपूर्वी लातूर मनपावर भाजप एकहाती सत्ता मिळवेल, अशी चर्चा होती. केंद्रात आणि राज्यात भाजपचेच सरकार असल्याने लातूरचा मतदार अन्य पर्याय शोधण्यापेक्षा भाजपच्या पाठीशी भक्कमपणे राहील असे बोलले जात होते. मात्र, ऐन मोक्याच्या काळात भाजपमध्ये अशा काही घटना, असे काही घडले की, संपूर्ण वातावरणच बदलून गेले. आता निवडणूक पार पडून निकालही हाती आले आहेत. त्यामुळे त्या बाबींचा पुन्हा पुन्हा उहापोह करणे फारसे उचित नाही. लातूरच्या काही सुजाण मतदारांनी मात्र भाजपच्या नेत्यांनी ऐनवेळी अति महत्वाकांक्षेपोटी सत्तेच्या जवळ जाणाऱ्या भाजपाला दूर लोटल्याच्याभावना व्यक्त केल्या. काँग्रेसच्या या यशात काँग्रेसपेक्षा भाजपच्याच मंडळींचा वाटा अधिक असल्याचेही काहींनी बोलून दाखवले. या निवडणुकीत एकूण १८ प्रभागातून ७० नगरसेवक निवडून द्यायचे होते. त्यामध्ये काँग्रेसने ४३, काँग्रेससोबत आघाडी केलेल्या वंचितने ४, भारतीय जनता पार्टीने २२ तर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने एक जागा जिंकली.

राष्ट्रवादीकडून माजी महापौर विक्रम गोजमगुंडे हे एकटेच विजयी होण्यात यशस्वी ठरले. काँग्रेसच्या माजी महापौर स्मिता खानापुरे, भाजपकडून महापौर पद उपभोगलेले आणि आता शिंदेसेनेकडून लढलेले सुरेश पवार यांना या निवडणुकीत पराभवाचा सामना करावा लागला. शिवसेना शिंदे गट, शिवसेना (उबाठा), राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार यांना एकही जागा जिंकता आली नाही. मागच्या मनपात राष्ट्रवादी काँग्रेसचे राजा मणियार हे एकमेव नगरसेवक होते. आता राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे एकमेव नगरसेवक म्हणून माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे काम पाहतील. या निवडणुकीत शेवटच्या टप्प्यात प्रवेश करून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने चांगलीच लढत दिली.

यावेळी त्यांना जास्त जागा जिंकण्यात यश आले नसले तरी एक समर्थ पर्याय म्हणून हा पक्ष निश्चित पुढे आला आहे, ही बाब मान्यच करावी लागेल. ऐन निवडणुकीच्या काळात अनेकांनी या पाकसातून त्या पक्षात आणि त्या पक्षातून या पक्षात अशा कोलांटउड्या मारल्या होत्या. अशा अनेक मंडळींना या निवडणुकीत अनपेक्षित पराभवाचा सामना करावा लागला. भाजप सध्याचा चलनी नाण्याप्रमाणे असल्याने अनेकांनी ऐन-वेळी अन्य पक्षातून भाजपमध्ये प्रवेश करून उमेदवारी मिळवल्या होत्या त्यांनाही पराभवाचाच सामना करावा लागला.

लातूर शहर महानगरपालिका निवडणूक पक्षीय बलाबल

| प्रभाग क्रमांक | एकुण जागा | कॉंग्रेस | वंचित | भाजपा | रा.कॉं. |
|---|---|---|---|---|---|
| १ | ४ | ३ | ० | १ | ० |
| २ | ४ | ३ | १ | ० | ० |
| ३ | ४ | ४ | ० | ० | ० |
| ४ | ४ | ३ | १ | ० | ० |
| ५ | ४ | ३ | ० | ० | १ |
| ६ | ४ | २ | ० | २ | ० |
| ७ | ४ | ३ | १ | ० | ० |
| ८ | ४ | ४ | ० | ० | ० |
| ९ | ४ | ४ | ० | ० | ० |
| १० | ४ | ४ | ० | ० | ० |
| ११ | ४ | ३ | ० | १ | ० |
| १२ | ४ | ४ | ० | ० | ० |
| १३ | ४ | ३ | १ | ० | ० |
| १४ | ४ | ० | ० | ४ | ० |
| १५ | ४ | ० | ० | ४ | ० |
| १६ | ४ | ० | ० | ४ | ० |
| १७ | ३ | ० | ० | ३ | ० |
| १८ | ३ | ० | ० | ३ | ० |
| एकुण | ७० | ४३ | ४ | २२ | १ |

## 'हिंद-दी-चादर' कार्यक्रमाविषयी जिल्ह्यात शाळा




**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १६ जानेवारी :** 'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथे २४ व २५ जानेवारी रोजी कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमाची व श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या कार्याची माहिती घरोघरी पोहोचविण्यासाठी शिक्षण विभागामार्फत विशेष जनजागृती मोहीम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेंतर्गत शाळा, महाविद्यालयांमध्ये श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या जीवनावर आधारित माहितीपट, गीत दाखविणे यासह विविध स्पर्धांचे आयोजन केले जात आहे.

### महाविद्यालयांमध्ये जनजागृतीस प्रारंभ

लातूर जिल्ह्यातील शाळांमध्ये आजपासून सुरु झालेल्या या उपक्रमात विद्यार्थ्यांना शाळेतील एलईडी स्क्रीनच्या माध्यमातून हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या जीवनावर आधारित माहितीपट आणि गीत दाखविण्यात आले. तसेच काही शाळांमधील विद्यार्थ्यांनी या गीताचे सामूहिक गायन केले. जिल्हा परिषद शाळांसोबतच जिल्ह्यातील शासकीय, निमशासकीय, खासगी शाळांमध्ये हा उपक्रम राबविण्यात आला.

हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांचा इतिहास विद्यार्थ्यांपर्यंत पोहचावा, यासाठी याविषयावरील चित्रकला, गायन, निबंध आणि वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन शाळा, महाविद्यालयांमध्ये केले जाणार आहे. या स्पर्धांमध्ये सहभागी सर्व विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित केले जाईल.

## धनशक्ती विरुद्ध जनशक्तीच्या लढाईत जनतेचा कौल मान्य : विक्रांत गोजमगुंडे

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १६ जानेवारी :** लातूर शहर महानगरपालिकेच्या निवडणूकीत धनशक्ती विरुद्ध जनशक्ती अशी लढाई झाली. दोन्ही विरोधी पक्षांनी धन आणि यंत्रणांचा प्रचंड वापर केला. या लढतीत जनतेने दिलेला कौल आम्हाला मान्य आहे. यापुढेही अविरतपणे जनसेवा करत राहू, अशी प्रतिक्रिया विक्रांत गोजमगुंडे यांनी दिली.

लातूर शहर महानगरपालिका निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या नेतृत्वात एकसंघपणे लढला. या निवडणुकीत सहकार मंत्री बाबासाहेब पाटील,माजीमंत्री आ. संजय बनसोडे, आ.विक्रम काळे, शहर जिल्हाध्यक्ष मकरंद सावे, ग्रामीण जिल्हाध्यक्ष अफसर बाबा शेख, व्यंकट बेद्रे, प्रचार समिती सदस्य बळवंत, जाधव माजी उपमहापौर चंद्रकांत बिराजदार, मूर्तुजा खान,सय्यद इब्राहिम, बबन भोसले, माजी नगराध्यक्ष लक्ष्मण कांबळे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी

### कार्यकर्त्यांना पाठबळ : विक्रांत गोजमगुंडे

लातूर शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने एकसंघपणे लढा दिला. राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, माजी मंत्री आ.संजय बनसोडे, आ. विक्रम काळे यांनी सामान्य कार्यकर्त्यांना पाठविले पाठबळ दिले. त्यांच्या बळावरच कार्यकर्ते निवडणुकीला सामोरे गेले. निवडणुकीतील निकाल काहीही असला तरी आम्ही जनतेच्या कामांसाठी यापुढेही कटिबद्ध आहोत. नेत्यांनी कार्यकर्त्यांवर विश्वास दाखवत दाखवला त्याबद्दल नेते, कार्यकर्त्यांसह मतदारांचेही गोजमगुंडे यांनी आभार मानले.



### मतदार व कार्यकर्त्यांचे मानले आभार

प्रचारासाठी जिवाचे रान केले. निवडणुकीदरम्यान राष्ट्रवादी काँग्रेसने विकासाची भूमिका मांडली. दोन्ही विरोधी पक्षांकडून धनशक्तीचा प्रचंड वापर करण्यात आला. विविध यंत्रणांचा ही वापर करण्यात आला. याद्वारे जनतेची दिशाभूल करण्यात आली. अनेक ठिकाणी खोटी आश्वासने देऊन दिशाभूल करण्यात आली, असे ते म्हणाले.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने विकासाचा अजेंडा जनतेला पटवून दिला. विरोधकांनी विकासाला बगल देत केवळ भावनिक विषयाभोवती निवडणूक फिरवली, भावनेचे राजकारण केले. निवडणुकीत पैशांचा प्रचंड वापर झाला. दबाव तंत्र व अफवा पसरविण्यात आल्या. तरीद-खील हक्काचा मतदार सोबतच राहिला. जनतेने विश्वासाने आम्हाला मतदान केले.मतदारांच्या विश्वासाला पात्र राहून यापुढे ही जनतेच्या हितासाठी लढत राहू. जे मतदार खंबीरपणे पक्षाच्या पाठीशी राहिले त्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त करतो, असेही गोजमगुंडे म्हणाले.

## 'हिंद-दी-चादर'च्या स्मृतींनी शाळा-महाविद्यालये भारावली

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १६ जानेवारी :** धर्म, सत्य आणि मानवी हक्कांच्या रक्षणासाठी सर्वोच्च बलिदान देणारे 'हिंद-दी-चादर' श्री गुरू तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षाचे औचित्य साधत लातूर आणि धाराशिव जिल्ह्यात शालेय स्तरावर व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. नांदेड येथे होणाऱ्या ऐतिहासिक मुख्य सोहळ्याच्या पार्श्र्वभूमीवर, शिक्षण विभागाने आयोजित केलेल्या या उपक्रमास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

जिल्ह्यातील शाळांमध्ये आजपासून विशेष उपक्रमांना प्रारंभ झाला. शासकीय आणि खासगी शाळांमधील विद्यार्थ्यांना एलईडी स्क्रीनद्वारे गुरुजींच्या जीवनपटावर आधारित माहितीपट (ऊेर्लीीशपींरीू) दाखविण्यात आले. यावेळी शाळांचा परिसर 'हिंद दी चादर' गीतांच्या सामूहिक गायनाने दुमदुमून गेला. केवळ पुस्तकी ज्ञान न देता, दृक-श्राव्य माध्यमातून गुरुजींचा त्याग विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवण्याचा प्रयत्न शिक्षण विभागाने केला आहे.

## जि.प., पं.स. निवडणुकीसाठी जिल्हास्तरीय आचारसंहिता कक्ष कार्यान्वित

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १६ जानेवारी :** राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीसाठी १३ जानेवारी २०२६ पासून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. न्याय्य, नि:पक्षपाती आणि पारदर्शक वातावरणात निवडणुका पार पाडण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या आदेशाने जिल्हा परिषद कार्यालयात जिल्हास्तरीय आदर्श आचारसंहिता कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

या कक्षाचे नोडल अधिकारी म्हणून जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ए. जे. तडवी यांची, तर सहायक नोडल अधिकारी म्हणून महिला व बाल कल्याण विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी जावेद शेख यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली आहे. या कक्षात प्रदीप बोंबले, बालाजी पोतदार, विष्णू शिंदे, राहुल सुतार आणि गणेश लोणकर यांचा समावेश आहे. तसेच, प्रत्येक तालुकास्तरावर संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या अधिनस्त आदर्श आचारसंहिता कक्ष स्थापन करण्यात आले आहेत.

निवडणूक प्रक्रियेदरम्यान आचारसंहितेचे कोणतेही उल्लंघन आढळल्यास नागरिकांनी त्वरित जिल्हा आदर्श आचारसंहिता कक्षाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. निवडणूक घोषित झाल्यापासून सर्व राजकीय पक्ष, उमेदवार आणि इतर संबंधित व्यक्तींनी आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन करणे अनिवार्य आहे.

## विकासापेक्षा भावनेला प्राधान्य : आ.संभाजी पाटील निलंगेकर



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १६ जानेवारी :** नुकत्याच झालेल्या महानगरपालिका निवडणुकीत भाजपाने विकासाचा मुद्दा मांडला. याउलट काँग्रेसकडून भावनिक विषयाभोवती निवडणूक फिरवण्यात आली. जनतेचा बुद्धिभेद करत ही निवडणूक झाली. जनतेने दिलेला कौल आम्हाला मान्य असून यापुढेही सर्व उमेदवार जनसेवेसाठी तत्पर असतील, अशी प्रतिक्रिया निवडणूक प्रमुख माजी मंत्री आ.संभाजी पाटील निलंगेकर यांनी व्यक्त केली.

लातूर शहर महानगरपालिकेच्या निकालानंतर प्रतिक्रिया व्यक्त करताना आ. निलंगेकर म्हणाले की, भाजपने विकासाच्या मुद्यावर निवडणूक लढवली. प्रचारादरम्यान विकासाची भूमिका मांडली.विकासाच्याच भूमिकेवर आम्ही मतदारांना सामोरे गेलो. विरोधकांकडे विकासाचा कुठलाही मुद्दा नव्हता. त्यामुळे त्यांच्या विजयाची शक्यताही नव्हती.जेंव्हा विजयाची शक्यता नसते तेंव्हा जनतेत संभ्रम निर्माण करण्याचे तंत्र काँग्रेसने वापरले. जनतेचा बुद्धिभेद केला आणि भावनिक विषयाभोवती निवडणूक फिरवली. प्रचारातही केवळ भावनिक विषय त्यांनी मांडले, असे आ.निलंगेकर म्हणाले. निकालानंतर जनतेने दिलेला आम्हाला मान्य आहे. मनपाच्या सभागृहात भाजपाचे २२ नगरसेवक असणार आहेत. हे २२ प्रतिनिधी जनहितासाठी,सर्वसामान्य लातूरकरांसाठी काम करतील. जनसेवा आणि सामान्य नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी कार्यरत राहतील. मतदारांनी भाजपाला साथ दिली त्याबद्दल सर्व मतदार, पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचेही मी आभार मानतो, असे आ. संभाजी निलंगेकर यांनी म्हटले.

**CHANGE OF NAME**

HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT I AM CHANGING MY WIFE'S NAME IN MY PASSPORT BEARING NO. **S2742554** FROM **UJJWALA DEVRAJ PILLAI** TO : **UJWALA DEVRAJ PILLAI**. HENCE FOR THIS DECLARATION SHE WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL BE USE **UJWALA DEVRAJ PILLAI** IN FUTURE. THE SAME NAME WILL BE USED BY ME, FAMILY, SPOUSE, CHILDREN AND RELATIVE.

OLD NAME : **UJJWALA DEVRAJ PILLAI**
NEW NAME : **UJWALA DEVRAJ PILLAI**
PASSPORT NO. : **S2742554**
ADDRESS : **FLAT NO.12, SADASHIV APARTMENT, SARASWATI COLONY, LATUR 413512, DISTRICT LATUR**
**MOBILE NO. 99233 33587 / 77700 14004**